सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### विवाहितेवर जीवघेणा हल्ला

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. विशेषतः विवाहित महिलांना सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या त्रासाचे प्रमाण वाढले असून, दोन भीषण घटनांनी समाजमन सुन्न झाले आहे. हुंडा आणि मानसिक छळाचा बळी पुण्यातील तरुण इंजिनीअर दीप्ती चौधरी हिने सासरच्या जाचाला कंटाळून आपले आयुष्य संपवले. उच्चशिक्षित असूनही तिला सासरच्यांकडून होणारा छळ सहन करावा लागला, हे या घटनेचे सर्वात दुर्दैवी पैलू आहे. माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार नाशिकमध्ये एका पतीने आपल्या पत्नीला बेदम मारहाण केली आणि त्यानंतर तिला बळजबरीने विषारी औषध पाजले. धक्कादायक बाब म्हणजे, पत्नीची प्रकृती खालावल्यावर तिला रुग्णालयात दाखल करून नवरा तिथून पसार झाला आहे. सध्या पीडितेवर उपचार सुरू असून तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली आहे.

### विवाहितेची आत्महत्या

**पुणे :** पुण्यातील सोरतापवाडी (ता. हवेली) येथे एका २८ वर्षीय विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आपलं जीवन संपवलं आहे. दीप्ती मगर-चौधरी असे या दुर्दैवी विवाहितेचे नाव आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी दीप्तीचा पती, सरपंच सासू, शिक्षक सासरे आणि दीर अशा चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हुंड्यासाठी छळ आणि मुलगी नको म्हणून जबरदस्तीने केलेला गर्भपात यामुळे दीप्ती प्रचंड मानसिक तणावाखाली होती, अशी माहिती समोर आली आहे.दीप्तीचा विवाह २०१९ मध्ये रोहन चौधरी याच्याशी मोठ्या थाटामाटात झाला होता. लग्नात ५० तोळे सोने देऊनही सासरच्यांची पैशांची हाव संपली नाही. माहेरून १० लाख रुपये रोख आणि चारचाकी गाडीसाठी २५ लाख रुपये देऊनही तिचा छळ सुरूच होता.

### महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना फायदा

**नवी दिल्ली :** मोदी सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्लीत एका उच्चस्तरीय बैठकीत महाराष्ट्रातून ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला मंजुरी दिली आहे. या खरेदीसाठी केंद्राने २६९६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. तूर खरेदी ही मूल्य समर्थन योजनेंतर्गत किमान आधारभूत किमतीनुसार होणार आहे.

### प्रजासत्ताक दिनाला गालबोट

**मुंबई :** सोमवार २६ जानेवारी रोजी स्पीकर कोसळून एका तीन वर्षांच्या चिमूरडीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना विक्रोळी येथे घडली. विक्रोळीच्या टागोर नगरमधील आंबेडकर नगर परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला. सोमवारी संपूर्ण भारत देशात ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा जल्लोष सुरू असताना विक्रोळीत मात्र या उत्साहाला गालबोट लागलं आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त लावण्यात आलेला स्पीकर कोसळून एका चिमूरडीचा मृत्यू झाला आहे. तिच्या या मृत्यूला एक चिंधीवाला जबाबदार असल्याचे समोर आले आहे. सिसिटीव्हीच्या फुटेजमधून चिंध्या गोळ्या करणाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात घडल्याचे समोर आले. तीन वर्षांची चिमूरडी रस्त्यावरून धावत जात असताना तिच्या अंगावर हा स्पीकर कोसळला. मात्र उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याच्या आतच तिचा मृत्यू झाला.

# बर्फवृष्टीमुळे श्रीनगरमधील विमानसेवा रद्द

**श्रीनगर/वृत्तसंस्था :** श्रीनगर विमानतळावरील येणारी - जाणारी सर्व उड्डाणे सततच्या बर्फवृष्टीमुळे आणि खराब हवामानामुळे रद्द करण्यात आली आहेत. नवीन बर्फवृष्टी झाल्याने श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्ग देखील बंद झाला आणि वाहतूक विस्कळीत झाली आहे.मंगळवार २७ जानेवारी रोजी काश्मीरमध्ये झालेल्या बर्फवृष्टीमुळे श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारी आणि जाणारी ५० विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



खराब हवामान आणि श्रीनगर विमानतळावर सुरू असलेल्या बर्फवृष्टीमुळे, विमान कंपन्यांनी आजची बहुतेक उड्डाणे रद्द केली आहेत, असे भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्यांनी सांगितले. श्रीनगर विमानतळावर आज चार विमाने येण्याचे नियोजित होते परंतु खराब हवामानामुळे हे शक्य नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच ताज्या अपडेट्स आणि पर्यायी व्यवस्थांसाठी प्रवाशांना त्यांच्या संबंधित विमान कंपन्यांच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देखील त्यांनी यावेळी दिला. विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे काश्मीरमध्ये हजारो पर्यटक अडकून पडले आहेत. नवयुग बोगदा आणि आसपासच्या परिसरात सुरू असणाऱ्या सततच्या बर्फवृष्टीमुळे मंगळवारी तेथील काही महामार्ग देखील वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त मुघल रोड, एसएसजी रोड आणि सिंथन रोड देखील निसारड्या रस्त्यामुळे वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत जम्मूहून श्रीनगर पर्यंत आणि श्रीनगरवरून जम्मू पर्यंत कोणत्याही वाहनांना प्रवास करण्याची परवानगी नसेल असे वाहतूक अधिकारींनी सांगितले.

# कर्तव्यपथावर 'गणपती बाप्पा मोरया'चा गजर

## प्रजासत्ताक दिनी दिसले देशाचे सामर्थ्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राजधानी नवी दिल्लीत कर्तव्यपथावर संचलनाचे अर्थात परेडचे आयोजन करण्यात आले होते. या संचलनात महाराष्ट्रासह एकूण १७ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे तसेच १३ केंद्रीय विभागांचे चित्ररथ सहभागी झाले.

परेड अर्थात संचलनाच्या माध्यमातून देशाचे सामर्थ्य, समृद्ध सांस्कृतिक वारसा, प्रगती, लष्करी पराक्रम यांचे प्रतिबिंब दिसले. भारताच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याची झलक दिसली.

चित्ररथांच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे, सांस्कृतिक विविधतेचे आणि विविध क्षेत्रांमधील स्वावलंबनाकडे होणाऱ्या प्रगतीचे दृश्य वर्णन सादर करण्यात आले. ज्यामध्ये हस्तकला आणि लोक परंपरांपासून ते स्वावलंबन, नवोन्मेष, संरक्षण तयारी आणि राष्ट्र उभारणी उपक्रमांपर्यंतच्या विषयांचा समावेश होता. परेडमध्ये सैनिकांच्या तुकड्या सहभागी झाली. लष्करी बँड पथके आकर्षक धून वाजवत परेडमध्ये सहभागी झाली.




महाराष्ट्राच्या चित्ररथाची गणेशोत्सव ही संकल्पना होती. या निमित्ताने दिल्लीत गणपती बाप्पा मोरया हा गजर घुमला. महाराष्ट्राचा चित्ररथ येताच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पियूष गोयल यांनी टाळ्या वाजवून कौतुक केले.

# छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांकडून आयईडी स्फोट; ११ जवान जखमी

**रायपूर/वृत्तसंस्था :** रविवारी २५ जानेवारीला छत्तीसगडमधील बिजापूरच्या उसुर पोलीस स्टेशन परिसरात आयईडी स्फोट झाला. इथे सुरक्षा दलांचे नक्षलविरोधी ऑपरेशन सुरू होते. ऑपरेशन सुरू असताना कर्रेगुट्टाच्या जंगलात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडीचा स्फोट झाला. या दुर्घटनेत सुरक्षा दलांचे ११ जवान जखमी झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, या नंतर जखमी जवानांना उपचारासाठी विमानं रायपूरला नेण्यात आले. जखमींवर रायपूरच्या रामकृष्ण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत डॉ. पंकज धबालिया यांनी दुजोरा दिला आहे.छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त



जिल्हा बिजापूरमध्ये सुरक्षा दलांचे नक्षलविरोधी ऑपरेशन सुरू असताना अचानक स्फोट झाला. या कारवाईत जिल्हा राखीव रक्षक (ऊठऋ) आणि बस्तर फायटर्सचे जवान सहभागी होते. याशिवाय, रिझोल्युट ॲक्शन कोब्रा सीआरपीएफच्या कमांडो बटालियनची टीम देखील सहभागी होती. या स्फोटात ११ जवान जखमी झाले, ज्यामध्ये डीआरजीचे १० आणि कोब्रा बटालियनच्या एका जवानाचा समावेश आहे.रामकृष्ण रुग्णालयाचे डॉ. पंकज धबालिया यांनी सांगितलं की, आयईडी स्फोटात जखमी झालेल्या ११ जवानांना रायपूरमधील रामकृष्ण रुग्णालयात आणण्यात आलं.

एका जवानाला प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आलं आहे. तर ११ जवानांवर अजूनही रामकृष्ण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी चार ते पाच जण गंभीर जखमी आहेत आणि काही जवानांवर शस्त्रक्रिया करण्यात येत आहे. या संपूर्ण घटनेनंतर आयईडी स्फोटात जखमी झालेल्या सर्व ११ जवानांना काल रात्री उशिरा लष्कराच्या एमआय-१७ हेलिकॉप्टरनं रायपूर इथं चांगल्या उपचारांसाठी नेण्यात आले.

# जिल्हा परिषद निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार; मंत्रालयातील बैठकीत मराठा आरक्षणवर चर्चा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २७ जानेवारी :** राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे. मात्र, मराठा आंदोलक उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी राज्य सरकारने हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भातील त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता, यासंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक संपन्न झाली, उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅजेट लागू करण्यास अडचणी येत आहेत. अशातच, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने यासंदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत.

# राज्यात ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्राची मान्यता : रावल

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २७ जानेवारी :** महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, राज्यात ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीस केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत पणन मंत्री जयकुमार रावल यांची उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याचा थेट लाभ राज्यातील लाखो तूर उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.



मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या हंगामासाठी महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांकडून ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीस केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. तुरीची खरेदी ८,००० रुपये प्रति क्विंटल या किमान हमीभावाने केली जाणार आहे. या खरेदीसाठी २० जानेवारी २०२६ पासून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे.

ही खरेदी प्रक्रिया नाफेड आणि एनसीसीएफ या केंद्रीय संस्थांमार्फत राज्य सरकारच्या समन्वयाने राबविण्यात येणार असून, त्यासाठी राज्यभरात ९३४ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.यावर्षी राज्यातील तूर उत्पादनाचा अंदाज १३.५१ लाख मेट्रिक टन इतका आहे. तसेच मागील हंगामात राज्यातील ८५ हजार शेतकऱ्यांकडून १३ लाख ३३ हजार १२८ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली होती, अशी माहितीही मंत्री रावल यांनी दिली.

# हिंदू समाजाला तीन मुले होण्यापासून कोणीही रोखलेलं नाही : डॉ. मोहन भागवत

**तभा वृत्तसेवा**

**मुझफ्फरपूर, दि. २७ जानेवारी :** मुझफ्फरपूर येथील सामाजिक समरसता चर्चासत्र बोलताना डॉ. मोहन भागवत म्हणाले की, भारतात विविधता आहे, भारत हा विविधतेने नटलेला आहे, परंतु विभाजीतता अजिबात नाहीये. ब्रिटिशांनी वाढत्या विभाजनांनी राज्य केलं; आता आपल्याला ती विभागणी संपवून समाजाला एकत्र करण्याची गरज आहे. लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रश्नावर म्हणाले की, सरकार दोन अपत्य धोरणाबद्दल बोलत असताना हिंदू समाजाला तीन मुलं होण्यापासून कोणीही रोखलेलं नाही.

आज भारताच्या प्रगतीसाठी



अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे, परंतु आव्हानं देखील कमी झालेली नाहीत. काही परदेशी शक्तींना भारताची प्रगती नको आहे कारण त्यांना त्यांची 'दुकानदारी' बंद पडेल अशी भीती त्यांना वाटते. म्हणूनच ते भारताच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भीती आणि कमकुवतपणावर मात करण्यासाठी स्वावलंबन आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला, जे समस्यांवर कायमस्वरूपी उपाय देऊ शकते. परदेशी शक्ती आणि भारताच्या प्रगतीची चिंता विषयी डॉ. मोहन भागवत म्हणाले.

जागतिक स्तरावर सुसंवादाच्या अभावाबद्दल सरसंघचालकांनी चिंता व्यक्त केली आणि सांगितलं की जर सुसंवाद नसेल तर लोक आपापसात लढतील आणि नष्ट होतील. ऐतिहासिक उदाहरणे देत त्यांनी स्पष्ट केलं की, कोणत्याही परदेशी शक्तीनं भारताला स्वतःच्या सत्तेनं वश केलं नाही, तर आपल्या अंतर्गत विभाजनांचा फायदा घेऊन राज्य केलं. जर समाजात सुसंवाद निर्माण झाला तर लोक एकमेकांचे सुख-दुःख वाटून घेतील आणि समस्या आपोआप सुटतील.

डॉ. भागवत म्हणाले की, समाज आता जागृत होत आहे आणि देश वेगाने प्रगती करत आहे. जर समाजाने ब्लॉक किंवा सबडिव्हिजन पातळीवर आपल्या समस्यांवर चर्चा केली तर लोकांना आता कोणत्याही नेत्यावर अवलंबून राहण्याची गरज राहणार नाही. त्यांनी विविध जाती आणि समुदायांच्या उन्नतीबद्दल तसंच इतर समुदायांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दलही विचारपूस केली. दुसऱ्या प्रश्नोत्तर सत्रादरम्यान, सरसंघचालकांनी केवळ समस्या दाखवण्याऐवजी उपाय देखील सुचवले पाहिजेत यावर भर दिला.

# पोलिसांची शहरात मध्यरात्री सिनेस्टाइल कारवाई; १५ किमी पाठलागानंतर तस्कर जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २७ जानेवारी :** शहरात मध्यरात्री एखाद्या चित्रपटालाही लाजवेल अशी थरारक घटना घडली. गुन्हे शाखेच्या पथकाने जीवाची पर्वा न करता धावत्या कारचा पाठलाग करत नशेच्या सिरप बाटल्यांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. केंब्रिज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरापर्यंत तब्बल १५ किलोमीटर चाललेल्या या सिनेस्टाइल पाठलागानंतर पोलिसांनी तिघा आरोपींना जेरबंद करत १८ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

या कारवाईत शेख समीर राजासाब (२४, रा. लातूर), सय्यद अल्ताफ वहाब (२३, रा. उदगीर) आणि उमर अब्दुल साहाब शेख (३६, रा. लातूर) यांना अटक करण्यात आली आहे. तर मुख्य आरोपी अशपाक पटेल (रा. चंपाचौक) तसेच लातूर येथील 'मराठवाडा मेडिकल'चा चालक-मालक यांचा पोलीस शोध घेत आहेत. गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, शहरात नाकाबंदी सुरू असताना संशयास्पद तवेरा कारला थांबण्याचा इशारा देण्यात आला. मात्र चालकाने कार न थांबवता ती सुसाट पळवली. पोलिसांनी पाठलाग सुरू करताच आरोपींनी पोलिसांच्या अंगावर गाडी घालून चिरडण्याचा प्रयत्न केला. या धोकादायक परिस्थितीत पोलीस अंमलदार दादासाहेब झारगड यांनी विलक्षण धाडस दाखवत थेट धावत्या कारच्या बोनेटवर उडी मारली. त्यांनी लाठीने काच फोडून आरोपींना रोखण्याचा प्रयत्न केला.



हा पाठलाग टीव्ही सेंटर ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरापर्यंत सुरूच राहिला. पंचायत समितीसमोर पोलिसांनी सापळा रचून कार अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी अंमलदार गणेश सागरे यांच्या अंगावर गाडी घातली. यात सागरे जखमी झाले. अखेर समोरून रस्ता बंद असल्याचे लक्षात येताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र चार पथकांनी प्रभावी घेराव घालत तिघांना ताब्यात घेतले.

तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, लातूरच्या 'मराठवाडा मेडिकल'मधून अवघ्या ८० रुपयांना मिळणारी नशेची सिरप बाटली संभाजीनगरात तब्बल ४०० रुपयांना विकली जात होती. या बेकायदेशीर तस्करीचे नेटवर्क उद्ध्वस्त करत पोलिसांनी १८ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या संपूर्ण ऑपरेशनवर पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी कॉन्फरन्स कॉलद्वारे सतत देखरेख ठेवली होती. या निर्णायक आणि धाडसी कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, गुन्हे शाखेच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# जि.प.- पं.स. निवडणूका विकासाच्या मुद्यावर जिंकणार : निलंगेकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २७ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका भावनिक नव्हे तर भाजपने गेल्या पाच वर्षांत लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात केलेल्या ठोस विकास कामांच्या आधारे लढवित आहे. मतदार २५ वर्षातील कॉंग्रेसच्या भ्रष्ट कारभारापेक्षा भारतीय जनता पार्टीच्या पारदर्शक विकास कामाला साथ देणार असल्याने भाजपा महायुती या निवडणूका जिंकणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, चेअरमन दगडू सोळुंके, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, संजय दोरवे, शेषराव ममाळे, मनोज पाटील, शाहूराज थेटे, हरिभाऊ सगरे आदी उपस्थित होते. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक निवडणूका विकासाच्या मुद्द्यावर झाल्या पाहिजेत, असा उल्लेख करत आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप जनतेसमोर विकासकामांचा लेखाजोखा मांडून मते मागणार आहे.

आम्ही नगरपालिका व महानगरपालिका निवडणुका विकासाच्या मुद्द्यावर लढलो. मात्र कॉंग्रेस भावनिक मुद्दे उपस्थित करून जनतेची दिशाभूल करीत आहे.

जागरूक मतदाराने कॉंग्रेसने २५ वर्षांत काय विकास केला आणि आम्ही मागील पाच वर्षांत कोणती विकासकामे केली याची तुलना केली पाहिजे.



लातूर जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता असताना जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून या भागातील भूजल पातळी वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आले. ही योजना ग्रामीण भागातील जनतेसाठी वरदान ठरली आहे. तसेच घरकुल योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ३ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना विहिरीसाठी अनुदान देण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यात राज्य शासन व केंद्र शासनाच्या निधीतून रस्त्यांचे मोठे जाळे उभारण्यात आले आहे. महिलांसाठी हिरकणी कक्ष, तसेच बचत गटांचे मजबुतीकरण यासारखे अनेक विषय मागील जिल्हा परिषद सत्ताकाळात मार्गी लागले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेमध्ये पुन्हा आपली सत्ता आली तर शेतकऱ्यांसाठी 'शेतरस्ता' मोहीम प्रभावीपणे राबवण्यात येईल व विद्यार्थी पटसंख्या अभावी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा बंद पडू देणार नाही अशी ग्वाही आमदार निलंगेकर यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात शिक्षण, आरोग्य, रस्ते व पाणी हे जनतेशी निगडित मुख्य विषय आहेत. गेल्या २५ वर्षांत कॉंग्रेसने शिक्षकावर शाळाबाह्य अतिरिक्त कामाचा बोजा टाकून जिल्हा परिषद शाळा बंद पाडून खासगी शिक्षण संस्थांचे जाळे वाढवले. शिक्षकांच्या बदलीच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आले.मात्र भाजपने ऑनलाईन बदली प्रणाली राबवून शिक्षण विभाग भ्रष्टाचारमुक्त केले.गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा दर्जा सुधारण्यात आला.

दिव्यांगांसाठी जिल्ह्यात पहिले ऑटिझम सेंटर उभारण्यात आले. तसेच साडेतीन लाख शौचालयांची उभारणी करण्यात आली असल्याची माहिती आ. संभाजी पाटील निलंगेकर दिली.

# खरोळा सेवा सहकारी संस्थेत प्रशासक नियुक्त

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि. २७ जानेवारी :** तालुक्यातील सर्वात मोठी असलेली खरोळा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था कारभारातील गंभीर अनियमितता, सहकार अधिनियमांचे उल्लंघन व कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी प्रशासकांच्या ताब्यात देण्यात आली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभा घेताना सभासदांना सभा वेळ व ठिकाणाची पूर्वसूचना दिली नाही. तसेच वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके, अंदाजपत्रके व सभेचे विषय नमूद असलेली नोटीस सभासदांना उपलब्ध करून देण्यात आली नाही. सभेचे रेकॉर्ड बोगस दाखविल्याचा ठपकाही ठेवण्यात आला.

या बाबत संस्थेचे संचालक डॉ. महेंद्र पिंपळे, शिवराज सप्ताळ व विश्र्वस देशमुख यांनी २०२२ मध्ये सहाय्यक सहकारी संस्था निबंधकांकडे तक्रार दाखल करून संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी चौकशी पथकाने अहवाल सादर केला. सहायक निबंधकांनी वादी व प्रतिवादींची सुनावणी घेतली. दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी अंतिम सुनावणीत संचालक मंडळ व सचिवांनी सहकार अधिनियमांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. अर्जदार डॉ. महेंद्र पिंपळे यांना वगळता उर्वरित १२ संचालकांना अपात्र ठरविण्यात आले, तर सचिवावर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. अपात्र संचालकांना दि. २१ जानेवारी रोजी सुनावणीसाठी नोटीस देण्यात आली होती. मात्र कोणीही संचालक उपस्थित न राहिल्याने व लेखी म्हणणे सादर न केल्यामुळे रेणापूर येथील सहायक सहकारी संस्था निबंधक मनिषा जरे यांनी जिल्हा बँकेतील शाखा तपासणीस प्रमोद रघुनाथ पवार यांची प्राधिकृत अधिकारी तथा प्रशासक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

## थोडक्यात...

### सुनेगाव शाळेत महिला मेळावा

**अहमदपूर :** अहमदपूर तालुक्यातील सुनेगावच्या (सां.) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ व महिला मेळावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मंगल सूरनर होत्या. यावेळी गट साधन केंद्रातील साधन व्यक्ती इंदूमती जोगदंड, अंधोरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य पर्यवेक्षिका के. बी. चव्हाण, आरोग्य सेविका आर. एल. मंदेवाड, कांता ढवळे, सुभद्रा पोले, गंगाबाई वडेर, सारिका सूरनर, मीना तुरेवाले, कुसूम सूरनर, आशा अंजली ढवळे, गंगासागर सूरनर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.सूत्रसंचालन मुख्याध्यापक प्रकाश भालेराव यांनी केले. आभार सहशिक्षिका शालिनी गुंजरगे यांनी मानले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक प्रकाश भालेराव, अंगणवाडी कार्यकर्ती वैष्णवी सूरनर, मदतनीस शीतल सूरनर, पवन सूरनर यांनी परिश्रम घेतले.

### निवडणुका, परीक्षा एकत्र आल्याने शिक्षकांची कसरत

**लातूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ आल्याने शिक्षकांची मोठी कसरत होत आहे. निवडणूक कामासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याने शाळेत कधी शिकवावे, बारावीच्या प्रॅक्टीकल व प्रात्यक्षिक परीक्षा कधी घ्याव्यात, असा प्रश्न शिक्षक करीत आहेत.

येत्या सात फेब्रुवारीपर्यंत निवडणुकीची धांदल असणार आहे. शुक्रवारी (दि. २३) बारावीच्या प्रॅक्टिकल परीक्षा होत्या. त्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षा आहेत. तसेच येत्या १० फेब्रुवारी २०२६ पासून इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा सुरू होत आहेत. पुढे २१ फेब्रुवारी २०२६ पासून इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षा सुरू होत रणधुमाळी मिनी मंत्रालायाची प्रवेश उशिरापर्यंत झाले आहेत. त्यामुळे शिक्षकांवर निवडणूक आणि परीक्षा, अशा दोन्ही पातळ्यावर काम पाहावे लागत असल्याने त्यांची मोठी कसरत होत असल्याची चर्चा शिक्षकांत आहे. फेब्रुवारी महिन्यापासून परीक्षा सुरू होतात. त्या पुढे मे महिन्यापर्यंत चालतात. यावर्षी अकरावी असल्याने अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्या परीक्षा कधी आयोजित करायच्या याबाबतचा तिढा अजून कायम आहे.यावर शालेय शिक्षण विभागाने फारसे सूतोवाच केलेले नाही. मात्र, यावर काही तरी लवकरात लवकर निर्णय घेऊन पुढच्या वर्षी शैक्षणिक वर्ष मागे-पुढे होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात प्रजासत्ताकदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**किनगाव, दि. २७ जानेवारी :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालयात ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजाचा ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

या ध्वजारोहण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिन प्राचार्य कॅप्टन डॉ बबनराव बोडके होते तर प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामजी बोडके, सहसचिव लताताई मोरे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष चाटे उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण मुख्याध्यापक डॉ संतोष पवार, पर्यवेक्षक प्रा विष्णू पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी रामजी बोडके यांच्या शुभहस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष रामजी बोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण झाले राष्ट्रगीता नंतर संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन प्रा विष्णू पवार यांनी केले यानंतर वरिष्ठ महाविद्यालयाच्या आणि आदर्श सेमी इंग्लीश स्कूलच्या बाल चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

यावेळी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त समर्पक मनोगत डॉ प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांनी व्यक्त करून सम्यक शुभेच्छा दिल्या यावेळी अंतर्गत मुल्यमापण कक्षाचे समन्वयक डॉ अनंत सोमवंशी, प्रा बालाजी आचार्य, डॉ भारत भदाडे, डॉ बळीराम पवार,डॉ संजय जगताप, डॉ पांडुरंग कांबळे, डॉ प्रभाकर स्वामी, डॉ सदाशिव वरवटे, डॉ दर्शना कानवटे, प्रा पद्मजा हगदळे, प्रा अंकिता जाधव प्रा कृष्णा केंद्रे, प्रा सुमेध जोगदंड,प्रा दयानंद सुर्यवंशी, प्रा निलेश पिटले, प्रा डॉ अंबादास मुळे,प्रा चंद्रमणी बनसोडे,प्रा लक्ष्मण क्षिरसागर, प्रा अभय गोरटे, प्रा राजु गुट्टे, कार्यालयीन अध्यक्ष गोपाळ इंद्राळे, उध्दवराव जाधव, आदि प्राध्यापक वृंद, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उमेश जाधव ज्ञानेश्वर खिडसे, श्रावण नवरखेले, अभिषेक भदाडे,पालक, नामदेवराव कांबळे मानसपूरीकर जगदिश वाघमारे, भगवान पेंडकर, अमोल भंडारपे, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते ध्वजारोहन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ विरनाथ हुमनाबादे, यांनी केले तर शेवटी आभार प्रा दिलीप कांबळे यांनी मानले.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त अहमदपूर प्रशासनाची विवाह सोहळ्यात जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २७ जानेवारी :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी अहमदपूर प्रशासनाच्या वतीने स्वीप पथकाद्वारे विविध ठिकाणी जनजागृती करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून येथील एका विवाह सोहळ्यात नव वरवधूंनी केली मतदार जनजागृती.

अहमदपूर शहरातील लातूर रोड वरील माधव मंगल कार्यालयात २५ जानेवारी रोजी एका विवाह सोहळा कार्यक्रमात विवाह संपन्न झाल्यानंतर नववधू व वरांनी मतदान करण्याची शपथ घेऊन मंडपातील सर्व नातेवाईकांना येणाऱ्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शंभर टक्के योगदान द्यावे असे नव वधू व वर यांच्या वतीने आवाहन करण्यात आले.

मंडपातील सर्व वऱ्हाडी मंडळींना स्वीप कलापथकाच्या वतीने येणाऱ्या ५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत आपल्या गावात १००% मतदान करुन या राष्ट्रीय कार्यात आपले योगदान द्यावे. असे पथकाच्या वतीने आव्हान करण्यात आले. सदरील अभियानांसाठी निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलदार उज्वला पांगरकर, गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे यांच्या आदेशानुसार अहमदपूर तालुक्यात स्वीप पथकाच्या माध्यमातून जनजागृती यशस्वी होण्यासाठी स्वीप पथक प्रमुख महादेव खळुरे,मोहन तेलंग,शिवकुमार गुळवे, बसवेश्र्वर थोटे, रमेश भालेराव आदिंनी परिश्रम घेतले.

# सांगोला येथे शवपेटीचे लोकार्पण

## रोटरी क्लब उदगीर व रोटरी क्लब सांगोलाचा संयुक्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल व रोटरी क्लब सांगोला यांच्या संयुक्त विद्यमानाने व आपुलकी प्रतिष्ठान सांगोला, संघर्ष मित्र मंडळ उदगीर आणि श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ उदगीर यांच्या सहयोगातून सांगोला जि. सोलापूर येथे सुरु करण्यात आलेल्या शवपेटीचे सांगोलाचे नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर यांच्या कल्पनेतून कै. राजकुमार भालचंद्र गाडे यांच्या स्मरणार्थ या शवपेटीची सोय करण्यात आली आहे. सांगोल्याचे नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या हस्ते या शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले.

सांगोला येथील वैकुंठ स्मशानभूमीत झालेल्या या लोकार्पण कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, सचिव विक्रम हलकीकर, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, गजानन चिद्रेवार, गोपाळ मुक्कावार, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळाचे अध्यक्ष रामदास जळकोटे, मिलिंद मुक्कावार, राहुल मुचेवाड, मल्लिकार्जुन चिल्लरगे, श्रीनिवास चंडेगावे, उदय धुर्वे, संघर्ष मित्र मंडळाचे अध्यक्ष अनिल मेंगा, विजय ढोबळे, महेश गुरमे आदींसह आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, रमेशअण्णा देशपांडे, महादेव दिवटे, दत्तात्रय खटकाळे, अतुल वाघमोडे, अच्युत फुले, अब्दुल गनी सय्यद सर, रो. हमीद शेख, रो. माणिक भोसले, प्रदीप गाडे, कपिल गाडे, प्रवीण आरबळी, चंद्रशेखर हिरेमठ, संग्रामसिंह गायकवाड, उमेश व्हटे, प्रतीक गाडे, विक्रम अडसूळ आदी उपस्थित होते.

# विषय समित्यांच्या सभापतींची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** नगरपरिषद सभागृहात विशेष सभेत न. प. विषय समित्यांच्या सभापती विशेष स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष स्वाती हुडे होत्या. तर पिठासन अधिकारी म्हणून तहसीलदार राम बोरगावकर यांनी काम पाहिले. त्यांना मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांनी सहकार्य केले. नगराध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. तर स्थायी समितीमध्ये सदस्य राजेश्वर निटुरे व गंगाबाई गुरुनाथ कपाळे यांची निवड करण्यात आली.तर शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी न. प. उपाध्यक्ष शितल नरसिंग शिंदे, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापतीपदी राजकुमार श्रीपती भालेराव, स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापतीपदी राजकुमार सभापतीपदी सय्यद रेश्मा खतीजा इमरोज, नियोजन व विकास समिती सभापतीपदी शहाजी भगवानराव पाटील आणि महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी खुर्शिदबी हनिफसाब सय्यद यांची निवड झाली आहे.

# माजी आमदार दिनकरराव माने यांचा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २७ जानेवारी :** औसा विधानसभा मतदारसंघाचे दहा वर्षे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ नेते, माजी आमदार दिनकरराव माने यांनी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासमवेत मुंबई येथे सोमवार दि. २६ रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यामुळे औसा विधानसभा मतदारसंघात उबाठा शिवसेनेला मोठे खिंडार पडले आहे.

मुंबई येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यास लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील व आमदार अभिमन्यू पवार यांची उपस्थिती होती.यावेळी भाजपात प्रवेश केलेल्या मान्यवरांचे भाजपा परिवारात स्वागत करण्यात आले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, तालुका प्रमुख आबासाहेब पवार, तालुका संघटक श्रीराम पवार यांच्यासह अनेक आजी-माजी सरपंच, चेअरमन, संचालक, ग्रामपंचायत सदस्य व विविध पदाधिकारी यांनीही भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. तसेच लातूर जिल्हा परिषदचे माजी बांधकाम सभापती व कॉंग्रेसचे पदाधिकारी अमरसिंह भोसले मातोळा यांनीही आपल्या अनेक सहकाऱ्यांसह भाजपा प्रवेश करून संघटन बळकट केले. या सर्व नवप्रवेशितांचे पक्षाच्या वतीने मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

औसा विधानसभा मतदारसंघाच्या दृष्टीने पक्षप्रवेश दूरगामी परिणाम करणारा असून, मतदारसंघाला राजकीय स्थैर्य देणारा ठरणार आहे. कुठल्याही भागाची राजकीय परिस्थिती जितकी स्थिर असते, तितक्याच वेगाने विकासाची चक्रे फिरू लागतात. त्या दृष्टीने पक्षप्रवेश औसा मतदारसंघाच्या विकासरथाला अधिक गती मिळेल असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# भाषण कलेमुळे वाणी समृद्ध होते-नगराध्यक्षा स्वाती हुडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात स्व.लालबहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ ४६ व्या मराठवाडा आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा स्वातीताई हुडे यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर प्रकाश यरमें प्रमुख उपस्थिती नगराध्यक्षा स्वाती हुडे उपनगराध्यक्षा शीतल शिंदे, शंकरराव लासूणे मधुकरराव वट्टमवार, , व्यंकटराव गुरमे, अंजलीताई नळगिरकर,ड शिवाजी बिराजदार, षण्मुखानंद मठपती मुख्याध्यापक संजय कुलकर्णी ज्ञानेश मातेकर, अंकुश मिरगुडे, श्रीपाद सिमंतकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक स्वातीताई हुडे यांनी वक्तृत्व ही एक कला आहे त्यामुळे वाणी समृद्ध होत जाते. म्हणून शाळा सोडून जाताना फक्त प्रगतीपत्रकच घेऊन न जाता संस्कार व संस्कृतीची जोपासना करणारे गुण घेऊन जावे असा विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रकाश येरमे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धक विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.बालाजी भंडारे, प्रा.डॉ. नयन राजमाने, डॉ. व्हि.के. नारायण लाभले आहेत.

उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन राहुल नेटके संतोष गजलवार प्रास्ताविक शंकरराव लासुणे स्वागत व परिचय निलेश मांडवकर, वैयक्तिक गीत बालाजी पडलवार तर आभार ज्ञानेश मातेकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता किरण नेमट यांच्या कल्याण मंत्राने झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, स्पर्धा प्रमुख अनिता मुळखेडे, सहप्रमुख राहुल नेटके सह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### आरोग्य सेविका आशा बिरादार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि. २७ जानेवारी :** दैठणा येथील आशा आरोग्य सेविका. आशा सतीश बिरादार यांचे दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ८ वाजता अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार दुपारी तीन वाजता पारंपरिक समशानभूमीत करण्यात आले



त्यांच्या पश्चात श्री. सतीश बिरादार तसेच तीन मुले गणेश, महेश व दिनेश असा परिवार आहे. सौ. आशा बिरादार या स्वभावाने अत्यंत मनमिळावू, कर्तव्यदक्ष व सेवाभावी होत्या. दैठणा गावातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी स्वतःहून पुढाकार घेतला होता. त्यांच्या कार्यामुळे त्या दैठणा ग्रामस्थांमध्ये विशेष आदराचे स्थान मिळवून होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनाने दैठणा गावावर शोककळा पसरली असून, आरोग्य क्षेत्रात अपूरणीय अशी हानी झाली आहे.

# घोणसी येथील पहिला आठवडी बैल बाजार जनावरांनी गजबजला

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. २७ जानेवारी :** जळकोट तालुक्यातील घोणसी येथे पहिल्या आठवडी बैल बाजाराची अधिकृत सुरुवात उत्साहात झाली. या पहिल्याच बाजारात जनावरांची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने संपूर्ण बाजार परिसर गजबजून गेला होता.

या बाजाराचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी उपस्थित व्यापाऱ्यांचा बाजार समिती घोणसी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. घोणसी परिसरातील सुमारे ३० ते ४० गावांतील शेतकरी व व्यापारी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या बाजारात सहभागी झाले. होते. पहिल्या आठवडी बाजारासाठी बैल, गाय, म्हैस, घोडे, रेडे, शेळ्या, कोंबड्या आदी जनावरे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आणण्यात आली होती.

या पहिल्या बाजारात माधव कृष्णापुरे (शेतकरी) यांनी बैलाची पहिली विक्री केली, तर सूरज सूर्यवंशी (मंगरुळ) यांनी पहिली खरेदी करत बाजाराचे पहिले मानकरी ठरले. विशेष म्हणजे पहिल्याच बाजारात सुमारे १०० बैलजोड्यांची खरेदी-विक्री यशस्वीरीत्या पार पडली. घोणसी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या बाजाराचा लाभ घेतला.

या बाजाराच्या यशस्वितेसाठी सरपंच शरद कोकणे, विजयकुमार भोसले, चेअरमन भानुदास मालुसरे, पत्रकार अंबादास गणुचे, विठ्ठल धोंड, पोलीस पाटील सोमेश्र्वर परगे, तंटामुक्त अध्यक्ष दत्त बिरादार तसेच सेवानिवृत्त पोलीस वाबुराव देवकत्ते, बबन मालुसरे, राहुल मालुसरे, आनंद बिरादार, राहुल बिरादार, संभाजी आंब्रे, प्रभाकर गणुचे, दयानंद जानतीने, अविनाश आंब्रे, गणेश गोदाजी, विशाल मालुसरे, मनोज मालुसरे, अनिल गव्हाणे, बालाजी जानतीने, पद्माकर भोसले, परमेश्वर डावळे, साईनाथ जानतीने, कालीदास डावळे आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# इस्लामिक नाटो हे षडयंत्रच!

दक्षिण आशियात भारताच्या विरोधात आणखी एक आघाडी उभारण्याचा प्रयत्न तथाकथित उम्माहचे बगलबच्चे करीत आहेत. चीनने फेकलेल्या तुकड्यावर गुजराण करणारा आपला पारंपरिक शत्रू पाकिस्तान पश्चिम आणि दक्षिण आशियातील देशांमध्ये लष्करी शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेषतः आखाती देशातील त्यातही सुन्नी आणि बरेलवी विचारधारा असलेल्या मुस्लिम देशांना शस्त्रास्त्रांची मदत आणि सैन्य प्रशिक्षण देण्याची धडपड कुख्यात गुप्तचर संस्था आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराने चालविली आहे. या घडामोडींमुळे पश्चिम आणि दक्षिण आशियातील शक्ती संतुलन बिघडण्याची चिन्हे असून त्याचा थेट परिणाम भारतावर पडणार आहे. कारण पाकिस्तानची प्रत्येक चाल नवी दिल्लीला लक्ष्य करीत चाललेली असते. या चालीमागे असतो तो अत्यंत घातकी आणि दगाबाज चीन. हा ड्रॅगन म्यानमार, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान आदी देशांचा प्याद्यांसारखा वापर करीत भारताला जमीन, आकाश आणि सागरी मार्गाने घेरण्याच्या चाली खेळत असतो. प्रथम कर्जाच्या रूपाने आर्थिक मदत करून चीन छोट्या देशांना आपल्या जाळ्यात अडकवतो आणि बदल्यात त्या देशाची एकतर भूमी ताब्यात घेतो किंवा लष्करी तळ उभारतो. श्रीलंका, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान या देशांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. भारताशी वैर पकडल्याने श्रीलंका तर अक्षरशः भिकेला लागली होती. अखेर भारताने अन्नधान्य, औषधे व आर्थिक मदत केल्याने लंकेची स्थिती काही प्रमाणात ताळ्यावर आली. के. पी. ओली आणि प्रचंड पंतप्रधान असताना नेपाळने चीनच्या चिथावणीने भारताला त्रास देण्याचा प्रयत्न केला; पण या लाल मर्कटांची कुकरीधारी जेन-झेडने अशी काही नशा उतरविली की, त्यांना घरदार सोडून पळून जावे लागले. अजूनही काहींची भारताविरुद्धची खुमखुमी गेलेली नाही. नेपाळ हिंदू देश असल्याने भारतही या देशाने काही आगळीक केली तरी मन मोठे करून त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आलेला आहे. भारत कुणालाही त्रास देत नाही, हा इतिहास आहे. अगदी प्राचीन काळापासून पाहिले तरी एखाद्या भारतीय राजाने दुसऱ्या देशावर आक्रमण करून नरसंहार केल्याचा अथवा लुटमार केल्याचा इतिहास नाही. उलटपक्षी पश्चिमेकडून अरब, तुर्क आणि मुस्लिमांनी वारंवार भारताला रक्तरंजित केले. नेपाळ-श्रीलंकेच्या पंक्तीत आता बांगलादेश जाऊन बसला आहे. या देशावर भारताचे एवढे उपकार आहेत की ते कधीही फिटणारे नाहीत; ज्यांचे पश्चिमेतील भाईबंद पूर्वेतील म्हणजे आपल्याच मुस्लिम बांधवांना गोळ्या घालून ठार मारत असताना, महिलांवर बलात्कार करीत असताना भारत मदतीला धावून आला आणि बांगलादेश नावाचा नवा देश जन्माला घातला. पण, आज तोच बांगलादेश धर्माच्या नावाखाली भारताला नख लावण्याचा प्रयत्न करतो आहे, धमक्या देतो आहे. अगदी वर्ष-दीड वर्षापूर्वी आशियातील उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून पुढे आलेला आणि ज्याचा जीडीपी भारताच्याही पुढे होता, असा बांगलादेश आता कंगाल होण्याच्या मार्गावर आहे. शेख हसीनांनी अल्प काळात बांगलादेशमध्ये आर्थिक सुधारणा केल्या. तो देश आता महागाई आणि कर्जाच्या विळख्यात अडकला आहे. भारताच्या कच्च्या मालावर ढाका, चित्तगाव, सिल्हेट येथील कारखाने चालायचे; ते आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. एवढे सारे होऊनही नवी दिल्ली अजूनही तेथील परिस्थिती शांत होण्याच्या प्रतीक्षेत आहे. कारण शेजारच्या घरी आग लागली तर आपल्याला त्याचा झळा सोसाव्या लागतातच. निष्पाप हिंदूंच्या हत्या, असंतोष आणि हिंसाचाराने इस्लामिक स्टेटच्या दिशेने निघालेला बांगलादेश अजूनही जळतो आहे आणि या आगीत पाकिस्तान तेल ओतण्याचे काम करीत आहे. अशीच आग आता दक्षिण आशियात लावण्याच्या कामी पाकिस्तान लागला आहे. सौदी अरेबिया आणि तुर्कस्तानला सोबत घेऊन 'इस्लामिक नाटो' नावाचा गट तयार करण्याचा खटाटोप इस्लामाबादने सुरू केला आहे. हा गट थेटपणे भारताविरुद्ध कारवाया करण्याची क्षमता बाळगणार नसला, तरी मध्यपूर्वेत आणि अरब देशांमध्ये भारताच्या हिताला बाधा आणू शकतो. पाकिस्तानच्या संरक्षण साहित्य उत्पादन विभागाचे मंत्री रझा हयात हर्राझ यांनी पाकिस्तान-सौदी अरेबिया-तुर्कस्थान यांच्यातील करार हा मुस्लिमांच्या हिताचे रक्षण करणारा असल्याचे म्हटले आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संरक्षणासाठी अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून असलेल्या आखाती देशांना भाड्याचे सैन्य आणि लष्करी साहित्य विकण्याची पाकिस्तानची योजना आहे. एकीकडे अमेरिकेच्या नेतृत्वातील नाटो ही लष्करी संघटना, नव्या काळात, जगातील कोणत्याही देशाचे काहीही वाकडे करू शकली नाही. आता ही तीन देशांची टिनपाट 'इस्लामिक नाटो' कोणते तीर मारणार आहे, असा विचार करून चालणार नाही. कारण हे षडयंत्र आहे. हा त्रिपक्षीय करार करण्यामागे पाकिस्तानचा स्वार्थ दडलेला आहे. चीन आणि पाकिस्तान संयुक्तपणे जेएफ-१७ या लढाऊ विमानांची आणि काही क्षेपणास्त्रांची निर्मिती करतात. चीनमधील चेंगडू या शहरात ही विमाने तयार केली जातात. एकूण निर्मित विमानांपैकी चीनच्या वाट्याला ५८ टक्के तर पाकिस्तानच्या वाट्याला ४२ टक्के विमाने येतात. पाकिस्तानला ही विमाने आणि क्षेपणास्त्रे सौदी, सुदानसह अन्य अरब देशांना विकायची आहेत. यासाठी सुदानसोबत १.५ बिलियन तर सौदीसोबत २ बिलियन डॉलर्सचा संरक्षण करार करण्याचा खटाटोप सुरू आहे. आतापर्यंत नाटो आणि युरोपियन देशांच्या छत्रछायेखाली राहिलेल्या आणि कट्टर इस्लामिक देश म्हणून उदयास येत असलेल्या तुर्कस्थानला आता युरोप आणि आशियात स्वतंत्रपणे वावरायचे आहे. नव्याने आकारास येणारी 'इस्लामिक नाटो' संघटना भविष्यात भारत आणि इस्रायलसाठी डोकेदुखी ठरणारी आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे, सौदी अरेबियाची आर्थिक शक्ती आणि तुर्कस्थानकडे असलेले ड्रोन तंत्रज्ञान, ही युती दक्षिण-पश्चिम आशियासह आफ्रिकेतील शक्ती संतुलन बिघडविणारी ठरणार आहे. मे २०२५ मधील 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सपाटून मार खाल्ल्यानंतर 'इस्लामिक नाटो'बाबत चर्चा सुरू झाली. नोव्हेंबर २०२४ मध्ये आराखडा तयार झाल्यानंतर तिन्ही देशांनी संघटना स्थापन करण्यास सहमती दर्शविली. भारताने चार दिवस चाललेल्या संघर्षात चीन आणि तुर्कस्थानच्या ड्रोन आर्मीचा सत्यानाश केला. अझरबैझान-आर्मेनिया युद्धात तुर्कस्थानच्या ड्रोन्सनी निर्णायक भूमिका निभावली होती. भारतासाठी अशा प्रकारची लढाई हा पहिलाच अनुभव होता. चीनची क्षेपणास्त्रे आणि तुर्कस्थानचे ड्रोन्स यांच्या एकत्रित शक्तीला भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने सीमेवरच रोखले. शेकडो क्षेपणास्त्रे आणि हजारो ड्रोन्स भारताने तयार केलेले अभेद्य हवाई कवच भेदण्यात अपयशी ठरली. २०१४ नंतरचा भारत हा काही वेगळाच आहे. शत्रूच्या आक्रमणाची प्रतीक्षा करीत संरक्षणात्मक भूमिका घेण्याऐवजी घरात घुसून मारण्याची क्षमता आणि शक्ती असलेला हा भारत आहे. उरी, डोकलाम, बालाकोट अन् गलवानच्या मैदानावर तसेच 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून जमीन आणि आकाशात शत्रूला चारीमुंड्या चित करण्याची धमक असलेला हा भारत आहे. शेकडो वर्षांपासून सुरू असलेली आक्रमणे झेलूनही जगात ताठ मानेने उभा असलेला हा देश आज कुणाच्याही धमकीला घाबरणारा नाही. जो देश स्वतःला जगाचा दादा समजतो, त्या अमेरिकेलाही न जुमानता भारत जगाच्या पटलावर आपल्या भूमिका निर्भयपणे मांडतो आहे. गाझाच्या उभारणीसाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थापन केलेल्या शांतता मंडळाला नवी दिल्लीने अजूनही भीक घातलेली नाही. कारण भारत आजही बहुपक्षीयतेला आणि संयुक्त राष्ट्राच्या श्रेष्ठतेला मानतो. त्यामुळे ट्रम्प यांचे शांतता मंडळ असो की इस्लामिक नाटो असो, भारत अशा तथाकथित शक्ती मंचांना आपले दीर्घकालीन हित आणि जागतिक शांतता लक्षात घेऊनच प्रतिसाद देत असतो. १४० कोटी लोकसंख्या आणि जगातील चौथी लष्करी महासत्ता असलेल्या भारताच्या लष्करी सिद्धतेचा पाया हा आजही सत्य, संयम आणि शांततेवर आधारलेला आहे. प्रथम आक्रमण न करण्याचे तत्त्व भारत पाळत आहे. युद्धांचा हजारो वर्षांचा अनुभव असलेल्या आणि बुद्धाचा देश असलेल्या या विशाल भारताचे इस्लामिक नाटोसारखे मंच काहीच वाकडे करू शकणार नाही. पण षडयंत्र असेल तर सावध राहायलाच हवे!

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# दोन देशांचे 'जन्मस्थान' - लाहोर!

आज २६ जानेवारी २६! तारखेचा असा योग आता एका शतकानंतर म्हणजे २१२६ मध्ये येईल. मात्र, ९४ वर्षांपूर्वी २६ जानेवारी १९३० या एका तारखेने २६ जानेवारीचा इतिहास रचला गेला. आणि तोही पाकिस्तानच्या लाहोर शहरात. लाहोरचा इतिहास फार मनोरंजक आहे. भारतीय स्वातंत्र्याचा निर्णायक क्षण- लाहोरने अनुभवला आणि पाकिस्तान निर्मितीचा पायाही लाहोरमध्येच घातला गेला. लाहोर शहर एकप्रकारे दोन्ही देशांचे 'जन्मस्थान' ठरले. लाहोर हे अतिशय सुंदर शहर असल्याचे सांगितले जाते. बहुधा म्हणूनच पंजाबीत एक म्हण आहे, 'जिसनै लहौर नहीं देख्या, कुछ नहीं देख्या!'

**दोन दरवाजे** : नवी दिल्लीतील लाल किल्ल्याचा एक दरवाजा 'लाहौरी दरवाजा' म्हणून ओळखला जातो तर लाहोरमधील एक दरवाजा 'दिल्ली दरवाजा' म्हणून ओळखला जातो. हे दोन्ही दरवाजे मोगल काळात बांधले गेले. दिल्ली आणि लाहोर यांना जोडणारा रस्ताही त्याच काळात बांधला गेला. दिल्ली दरवाजातून निघणारा रस्ता थेट लाहोर दरवाजापर्यंत जात असे, तर लाहोरच्या दिल्ली दरवाजातून निघणारा रस्ता थेट दिल्लीच्या लाहौरी दरवाजापर्यंत जात असे. सायंकाळी अंधार पडला की हे दोन्ही दरवाजे बंद केले जात असत.

**पुष्पहार!** : १९४७ च्या फाळणीनंतर एक उर्दू लेखक सादत हसन मिंटो यांनी एक व्यंगात्मक कथा लिहिली होती, त्या कथेचे शीर्षक होते- 'पुष्पहार'! एका सत्य घटनेवर ही कथा लिहिण्यात आली होती. सर गंगाराम या भारतीय अभियंत्याने १९२१ मध्ये लाहोर शहरात एक रुग्णालय बांधले, सर गंगाराम रुग्णालय. नंतर सर गंगाराम यांचा संगमरवरी पुतळा शहरात उभारण्यात आला. १९४७ च्या फाळणीनंतर सारेच वातावरण बदलले. एका दिवशी एक मोठा जमाव पुतळ्याच्या दिशेने निघाला. अनेकांच्या हातात चपला- जोडे यांच्या माळा होत्या. काहींनी सोबत डांबर घेतले होते. पुतळ्याला चपला- जोड्यांचा 'हार' घालावयाचा आणि नंतर पुतळ्याच्या चेहऱ्यावर डांबर फासावयाचे असा जमावाचा मानस होता. एक इसम हाती चपला-जोड्याची माळ घेऊन पुतळ्याच्या चबुतऱ्यावर चढला. तेवढ्यात पोलिस आले. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार सुरू केला. त्यात हा इसम जखमी झाला. मग जमाव ओरडू लागला, ''अरे त्याला ताबडतोब गंगाराम रुग्णालयात भरती करा.'' काही क्षणांपूर्वी हाच जमाव गंगाराम यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यास सरसावला होता, तोच जमाव आता जखमींना गंगाराम रुग्णालयात नेण्यास सांगत होता. फाळणीनंतर लाहोर पाकिस्तानात गेले आणि स्वाभाविकच गंगाराम रुग्णालयही पाकिस्तानात गेले. मग, गंगाराम यांनी नवी दिल्लीत नवे गंगाराम रुग्णालय सुरू केले. विशेष म्हणजे लाहोर व नवी दिल्ली दोन्ही शहरांत आजही गंगाराम रुग्णालय सुरू आहे आणि दोन्ही रुग्णालये अत्याधुनिक म्हणून नावारूपास आली आहेत.



**पूर्ण स्वराज्य** : अशा या लाहोर शहराने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा अनुभवला. २९ डिसेंबर ते १ जानेवारी १९३० रोजी लाहोर शहरात झालेल्या काँग्रेस अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्य' मिळविण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला आणि २६ जानेवारी हा भारताचा स्वातंत्र्य दिन असेल असेही घोषित करण्यात आले. या ठरावात प्रामुख्याने दोन तीन बाबी सांगण्यात आल्या होत्या.

१. ब्रिटिशांच्या गुलामगिरीपासून देशाला मुक्त करणे हे काँग्रेसचे लक्ष्य असेल. २. २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून साऱ्या देशभर साजरा केला जाईल. ३. अधिवेशन काळात ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री लाहोरमध्ये रावी नदीच्या किनाऱ्यावर पं. जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय तिरंगा फडकाविला.

**१० वर्षांनंतर...** : लाहोर शहराजवळून वाहणाऱ्या रावीच्या पात्रातून १० वर्षांत बरेच पाणी वाहून गेले. १९४० मध्ये याच लाहोर शहरात २२ ते २४ मार्च या तारखांना मुस्लिम लीगचे अधिवेशन झाले. त्यात स्वतंत्र मुस्लिम देशाचा प्रस्ताव पारित करण्यात आला. या प्रस्तावात नव्या देशासाठी पाकिस्तान या नावाचा उल्लेख नव्हता. पण, यावेळी पारित करण्यात आलेल्या प्रस्तावाला 'पाकिस्तान प्रस्ताव' असे नाव देण्यात आले होते. हा प्रस्ताव भारताच्या फाळणीचा आणि पाकिस्तानच्या स्थापनेचा आधार ठरला.

**ब्रिटिशांची चाल** : १९४७ मध्ये भारताची फाळणी करताना ब्रिटिशांनी पाकिस्तानसाठी १४ ऑगस्ट तर भारतासाठी १५ ऑगस्ट या तारखा निवडल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात ब्रिटिशांसाठी विशेषत भारताचे व्हाईसराय लॉर्ड माऊंटबॅटन यांच्यासाठी १५ ऑगस्ट ही एक महत्त्वाची तारीख होती. दुसऱ्या महायुद्धात १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने मित्र देशांसमोर शरणागती पत्करली. याने आशियातील महायुद्ध संपले. त्यावेळी लॉर्ड माऊंटबॅटन हे मित्र सैन्याचे दक्षिण पूर्व आशियातील सर्वोच्च सेनापती होते. त्यांच्या मनात की डोक्यात १५ ऑगस्ट ही तारीख घट्ट बसली होती. त्यांनी भारत विभाजनासाठी तीच तारीख निवडली. १५ ऑगस्ट रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर, भारताच्या नव्या सरकारने- नेहरू सरकारने १९३० च्या काँग्रेस प्रस्तावाचा आदर करण्यासाठी २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला तर पाकिस्तानने लाहोर अधिवेशनाच्या स्मृती जागविण्यासाठी २३ मार्च हा 'पाकिस्तान दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

**योगायोग** : एक योगायोग म्हणजे १९३० च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणारे पं. जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले तर १९४० च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणारे मोहम्मद अली जिना पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले.

**दोघांचेही निधन** : भारतात राष्ट्रपिता मानल्या जाणाऱ्या महात्मा गांधींनी देशाची फाळणी टाळण्याचा प्रयत्न केला. पण, त्यात यश येण्याची शक्यता नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी फाळणीस होकार दिला. दुसरीकडे जिना यांनी फाळणीचा मुद्दा सोडला नाही. त्यांना पाकिस्तानचे राष्ट्रपिता मानले जाते. महात्मा गांधी व मोहम्मद अली जिना अशा या दोन्ही राष्ट्रपित्यांचे निधन एकाच वर्षात १९४८ मध्ये झाले हा आणखी एक योगायोग.

**प्रजासत्ताक आणि...** : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हे काही योगायोग सोडले तर दोन्ही देशांत किती भिन्नता आहे. भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राहिला तर पाकिस्तानात सत्ता चालली ती लष्कराची! भारतात कधी लष्करी उठावाची चर्चा झाली नाही. याला एक अपवाद राहिला. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. त्यावेळी जनरल माणेकशा यांना अफाट प्रसिद्धी व लोकप्रियता मिळाली. त्यावेळी जनरल माणेकशा हे इंदिरा गांधी यांचे सरकार उलथविण्याचा प्रयत्न करणार आहेत हे काही काँग्रेस नेत्यांनी इंदिरा गांधींच्या मनावर ठसविले होते. पण, फक्त काही दिवस. नंतर ही सारी चर्चा निराधार असल्याचे स्पष्ट झाले. हा एक अपवाद वगळला तर भारतात लष्कराकडून सत्ता काबीज केली जाण्याची चर्चाही ऐकू आली नाही. दुसरीकडे पाकिस्तानात सरकार कुणाचेही असो, तेथे सत्ता चालते ती फक्त लष्कराची. आज पाकिस्तानातील शाहबाज शरीफ सरकारची अवस्था काय झाली आहे? सारी सत्ता फिल्ड मार्शल मुनीर यांच्या हाती एकवटली आहे. बहुतेक पाकिस्तानी नेते व लष्करी अधिकारी यांनी आपला सारा पैसा स्वीस बँकेत जमा केला आहे. पाकिस्तान कंगाल आहे, पण नेत्यांचा व लष्करी अधिकाऱ्यांच्या पैशाने स्वीस बँका जणू तुडुंब भरल्या आहेत. प्रजासत्ताक भारत आपले 'चांद्रयान' चंद्रावर उतरविण्यात यशस्वी झाला आणि लष्करीसत्ताक पाकिस्तान? पाकिस्तानचा 'चांद' फक्त त्याच्या हिरव्या झेंड्यावर आणि ईदच्या दिवशी आकाशात पाहण्यापुरताच मर्यादित राहिला.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# इस्रोचा क्रांतिकारी प्रवास

सोमवार, २६ जानेवारी रोजी संपूर्ण देशात ७७ वा प्रजासत्ताक दिन हर्षोल्हासात साजरा होत आहे. याच पृष्ठभूमीवर भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने स्वतःचे अंतराळ स्थानक निर्माणाच्या दिशेने हालचाली वाढविल्या आहे. २०३५ पर्यंत हे उद्दिष्ट गाठायचे असून खाजगी कंपन्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. १६ जानेवारी २०२५ रोजी इस्रोने अंतराळात दोन यानांना एकत्र जोडून (स्पेस डॉकिंग) खळबळ उडवून दिली होती. अशी कामगिरी करणारा भारत चौथा देश ठरला. निर्धारित उपक्रमाचा पहिला टप्पा २०२८ मध्ये सुरू होणार आहे. सध्या जगात अमेरिका, रशिया आणि चीन या दृष्टीने आघाडीवर असले, तरी भारताचा हा उपक्रम पूर्णतः स्वतःच्या ताकदीवर राबविला जाणार आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांनी १५ ऑगस्ट १९६९ मध्ये या अंतराळ संशोधन संस्थेची स्थापना केली. तत्पूर्वी या संस्थेचे नाव 'इनकोस्पार' असे होते. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात भारताची परिस्थिती सर्वच अंगांनी कमकुवत असल्याने रॉकेटचे भाग सायकलने वाहून न्यावे लागले होते. आता त्याच इस्रोचा डंका संपूर्ण जगात झडत आहे. भारतीय प्रक्षेपण मोहिमांच्या यशाची टक्केवारी ९७ पर्यंत आहे; जी जगात सर्वाधिक आहे. दोन-तीन दुर्घटना सोडल्या तर इस्रोच्या सर्वच मोहिमा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाल्या. पहिल्याच प्रयत्नात मंगळावर यान पाठविणारा भारत जगातील एकमेव देश ठरला आहे. शिवाय एकाच वेळी तब्बल १०४ उपग्रह प्रक्षेपित करून अंतराळात आपल्या निर्धारित कक्षेत स्थापन करण्याची किमया इस्रोने करून दाखविली असून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरविणारा भारत एकमेव देश आहे. भारताचे यान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्यापूर्वी रशियाच्या रॉसकॉसमॉसने घाईघाईत आपले यान पाठविले. परंतु, ते चंद्रावर उतरण्यापूर्वीच जळून खाक झाले. चंद्रावर पाण्याचे नमुने भारतानेच सर्वप्रथम शोधले. भारताच्या या संशोधनामुळे चंद्रावर मानवी वस्ती उभारण्यासाठी वाव मिळाला आहे. मनुष्याला अंतराळात पाठविण्यासाठी गगनयान मोहिमेवर काम सुरू आहे. इस्रोने आजपर्यंत १०० वर मोहिमा यशस्वी करून दाखविल्या आहेत. विशेष म्हणजे, आपल्या मोहिमा खूपच कमी खर्चाच्या पण परिणामकारक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. सध्या अंतराळात दोन स्थानके कार्यरत आहे. त्यापैकी चीनचे स्वतःचे स्वतंत्र स्थानक आहे तर अमेरिका, रशिया, जपान, कॅनडा आणि युरोपियन देशांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक कार्यरत आहे. रशियाकडे पूर्वी स्वतःची दोन स्थानके होती. परंतु, आता हा देश आयएसएसमध्ये सामील झाला आहे. अमेरिकेकडेसुद्धा स्काय लॅब नावाने स्वतःचे अंतराळ स्थानक होते. प्रारंभी रशिया आणि अमेरिकेमध्ये अंतराळ मोहिमा राबविण्याबाबत स्पर्धा होती. तेव्हा हे दोनच देश आघाडीवर होते. अवकाशात मनुष्य पाठविणारा तेव्हाचा सोव्हिएत संघ अर्थातच आताचा रशिया हा पहिला देश होता. रशियाचा युरी गागरीन सर्वप्रथम अंतराळात गेला. रशिया तेव्हा अमेरिकेपेक्षा आघाडीवर होता. परंतु, नंतर एन १ मून हे रॉकेट अपयशी ठरले आणि रशियाचा अंतराळ उपक्रम कमकुवत होत गेला. त्यामुळे अमेरिकेने चंद्रावर माणसे पाठवून आपले निर्विवाद वर्चस्व स्थापित केले. आता पुन्हा स्पर्धा निर्माण झाली असून, या स्पर्धेत भारत आघाडीवर आहे. वातावरण नसल्याने सूर्याची किरणे चंद्रावर थेट पडतात. त्यामुळे चंद्रावर हिलियम-३ चा साठा प्रचंड प्रमाणात असू शकतो. हिलियम-३ प्राप्त झाल्यास हजारो वर्षांच्या ऊर्जेची सोय होऊ शकते. त्यामुळे अमेरिकेसारखा प्रगत देश चंद्रावर मानवी वस्ती उभारण्यासाठी जोर लावत आहे. आता भारतानेही यात उडी घेतली असून आगामी काळात या क्षेत्रात भारत मोठी क्रांती घडवून आणेल, यात शंका नाही. भारत सध्या आर्थिक संक्रमणाच्या काळातून जात आहे. अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असतानाच अंतराळ संशोधनात गगनभरारी घेतली आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशांच्या तुलनेत भारत सरकार ठरवूनही इस्रोला पाहिजे तितका निधी देऊ शकत नाही. मात्र, आपल्या संशोधकांनी कमी खर्चाच्या मोहिमा राबवून जगाचे लक्ष वेधून घेतले . २०२५-२६ साठी सरकारने इस्रोला १.६ अब्ज डॉलर्स इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. इतक्या कमी खर्चात इस्रोला आपल्या मोहिमा राबवाव्या लागणार आहे. दुसरीकडे अमेरिकन सरकार दरवर्षी २५ ते २७ अब्ज डॉलर्स इतका निधी नासाला उपलब्ध करून देते. भारतीय चलनात हा आकडा २ लाख कोटींपेक्षा अधिक होतो. अशाही परिस्थितीत अनेक छोटे-मोठे देश इस्रोवरच अवलंबून असून या माध्यमातून परकीय चलन भारतात येत आहे. भारत सरकार इस्रोच्या बजेटमध्ये दरवर्षी वाढ करीत आहे. गगनयान मोहिमेसाठी सरकारने १९ हजार कोटींपेक्षा अधिकचे बजेट उपलब्ध करून दिले आहे. एकूणच भारताला विश्वगुरू बनविण्याच्या मोहिमेत इस्रोचे मोठे योगदान राहील, यात शंका नाही.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# प्रजासत्ताक दिनाचे चिंतन

२६ जानेवारी १९५० या दिवशी आपण प्रजासत्ताक राष्ट्र झालो. या दिवशी या देशातील प्रत्येक सामान्य माणसाला त्याचे अधिकार मिळाले. देशातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्ती व निर्धन व्यक्ती या दोघांनाही कायद्याने, संविधानाने समान दर्जा प्राप्त झाला. ज्यावेळेस भारत स्वतंत्र झाला त्यावेळेला जगामध्ये अनेकानेक देश असे होते की जेथे राज्यतंत्र अस्तित्वात होते. भारतातही अनादिकाळापासून राजेशाही नांदत आलेली होती. तरीसुद्धा भारताने लोकशाही स्वीकारली. या लोकशाहीला अधिक बळकट केले गणराज्य दिवसाने. गणराज्य दिवसालासुद्धा ७५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आम्ही ज्या दिशेने प्रवास सुरू केला होता त्या दिशेने आम्ही कुठवर पोहोचलो, काय प्राप्त केले याचा विचार करणे गरजेचे आहे.

नुकत्याच महानगर पालिकेच्या निवडणुका झालेल्या आहेत. मतदानाची टक्केवारी ५० इतकी कमी होती. सुशिक्षित आणि चांगले लोक राजकारणाचा स्तर पाहून किंवा स्वतःच्या आळसाने मतदान करायला जात नाहीत. ही किती चिंताजनक परिस्थिती आहे. प्रबुद्ध लोक मतदानाला जात नाहीत. अडाणी अशिक्षित लोक गठ्ठा मतदान करतात. सुशिक्षित लोकांची उदासीनता हे सुदृढ लोकशाहीसाठी, सुदृढ गणतंत्रासाठी चांगले लक्षण नाही. लोकांना अज्ञानात ठेवून इतकी वर्षे ज्यांनी राज्य केले त्याचे जे काही दुष्परिणाम समाजाला आणि राष्ट्राला भोगावे लागले. परंतु अजूनही समाज जागृत व्हायला तयार नाही. सज्जनांची उदासीनता, निष्क्रियता ही दुर्जनांच्या सक्रियतेला प्रोत्साहन देते.

संविधानाने तुम्हाला मतदानाचा अधिकार दिला. भारतातल्या सर्वांत सुशिक्षित माणसाचे मत आणि अशिक्षित माणसाचे मत या दोघांचेही मूल्य संविधानाने सारखे ठरवलेले आहे. त्यामुळे गठ्ठा मतदानाद्वारे तुम्ही योग्य माणसाला हरवू शकता आणि अयोग्य माणसाला जिंकून सुद्धा आणू शकता. ही लोकशाहीची थट्टाच आहे! गुन्हेगार सुद्धा तुरुंगातून निवडून येतात. या समाजाला आपला नेता कुठल्यातरी आरोपात शिक्षा भोगत आहे हे पाहून सुद्धा त्यालाच निवडून देण्याची इच्छा होते. यावरून त्यांच्या मनावर, विचारांवर कशा पद्धतीचे पांघरूण पडलेले आहे हे आपल्या लक्षात येते. प्रजातंत्रासाठी हे घातकच आहे.

एखाद्या भौगोलिक क्षेत्रामध्ये एखादा थोर समाजसेवक जरी राहत असेल तरी तो त्याच्या जातीचे लोक त्या भूभागात राहत नाहीत यामुळे निवडणुकीमध्ये सहज पराभूत होऊ शकतो. कारण आताच्या निवडणुका या जातीवर आधारित आहेत. मतदानाचा अधिकार मला मिळाला पाहिजे यासाठी जनता जागरूक आहे. पण मतदानाच्या कर्तव्याबद्दल मात्र ती उदासीन आहे. अधिकार तेव्हा सिद्ध होतो जेव्हा त्यासाठी कर्तव्यांची किंमत दिली जाते. परंतु समाज आपल्या कर्तव्यांबद्दल उदासीन दिसून येतो. ही काही चांगली परिस्थिती नाही. कुठलाही नवीन कायदा सरकारने केला तर त्यातील पळवाटा समाजातील हुशार लोक शोधून काढतात आणि कायद्याला केराची टोपली दाखविली जाते. आम्हीच आमच्यासाठी तयार केलेल्या कायद्यांना जर केराची टोपली दाखविणार असू तर प्रजातंत्र कसे बळकट होईल? वाहतुकीचे नियम तोडणारा, कायद्याच्या पळवाटा काढणारा, आयकर बुडविणारा स्वतःला हुशार समजतो आणि कसा बुडविता येतो हेही तो लोकांना मोठ्या उत्साहाने समजावून सांगतो. ही पण परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

आरक्षणाच्या नावावर चालणारी आंदोलने समाजातील एकोपा नष्ट करण्यासाठी कारणीभूत ठरतात असा अनुभव आहे. भारतात राहणारा कुठलाही समाज असो त्याने एकोप्याने राहणे, राष्ट्रीय एकात्मता बळकट ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी जाती, पंथ, भाषा यावर भांडणे निर्माण होणे प्रजासत्ताकासाठी घातकच आहे. देशाच्या रक्षणासाठी सैन्य, समाजाला न्याय मिळण्यासाठी न्यायव्यवस्था, निवडणूक उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोग या सर्व व्यवस्था आम्हीच निर्माण केलेल्या आहेत. आपल्या व्यक्तिगत किंवा पक्ष स्वार्थासाठी त्यावर शंका घेणे आणि ती संपूर्ण व्यवस्थाच खराब आहे अशा पद्धतीचा आग्रह धरणे हे प्रजातंत्रासाठी योग्य नाही. प्रत्येक व्यवस्थेमध्ये काही दोष असू शकतात. हे दोष चांगल्या लोकांनी दाखवून दिले पाहिजेत. त्यामध्ये सुधारणेचा आग्रह सुद्धा धरला पाहिजे. पण तो आग्रह सुद्धा लोकशाही मार्गानेच असला पाहिजे. आज आपण पाहतो की, अनेक आंदोलनांमध्ये महामार्ग अवरुद्ध केले जातात. सरकारी आणि खाजगी संपत्तीचे नुकसान आणि जाळपोळ केली जाते. लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा तर जनतेचा अधिकारच आहे. परंतु त्यासाठी महामार्ग अवरुद्ध होणार नाहीत, सर्वसामान्य जनतेला त्रास होणार नाही, सरकारी व खाजगी मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी करणारा समाजच प्रजातंत्र मजबूत करू शकतो. आज भारत वेगाने प्रगतिपथावर जात आहे. कदाचित विकसित राष्ट्र हे स्वप्न भारताचे साकारही होईल. परंतु जागृत, सक्रिय, कर्तव्यदक्ष समाजाच्या स्वप्नाचे काय? व्यवस्था अनेक बनविता येतील. परंतु व्यवस्थेचा आदर राखणारा समाज निर्माण करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

एका गावामध्ये रात्रीच्या वेळेस लोकांना रस्त्यावरून ये-जा करण्यासाठी अंधाराचा त्रास होऊ नये म्हणून पथदिवे लावण्यात आले. परंतु लक्षात असे आले की तो दिवा कोणीतरी आपल्या घरी लावण्यासाठी चोरून नेलेला होता. असे अनेक वेळा झाले. तेव्हा ग्रामपंचायतीने त्या मार्गावर पथदिवे लावणे बंद केले. ऑफिसमधील कागद घरी नेणारा समाज, सरकारी गाडीचा दुरुपयोग करणारे अधिकारी, सत्तेचा गैरवापर करणारे राजकीय नेते आणि ''तो थुंकला म्हणून मीही थुंकणार'' अशा मानसिकतेचा समाज ही सर्वच प्रजासत्ताकासमोरील आव्हाने आहेत. प्रजासत्ताक दिन आपल्याला आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचे स्मरणही करून देणारा दिवस आहे. या निमित्ताने नागरी कर्तव्यांचे जागरण करणे आवश्यक आहे. गृह संपर्काच्या निमित्ताने घराघरांमध्ये जाऊन सामाजिक सुव्यवस्थेसाठी नागरी कर्तव्यांची चर्चा व्यक्तींशी करणे आवश्यक आहे. वाहतुकीचे नियम पाळणारा समाज, पाणी, वीज, आयकर वेळेवर भरणारा समाज, नदी, नाले, जलाशय यांना प्रदूषणमुक्त ठेवणारा समाज, ''वापरा आणि फेकून द्या'' अशा प्रकारच्या प्लॅस्टिकला नाही म्हणणारा समाज प्रजासत्ताकाचा आधारस्तंभ आहे. देश नदी, नाले, पर्वतांनी मोठा बनत नाही. तर तो त्या देशामध्ये राहणाऱ्या समाजाच्या जीवनामध्ये कोणते जीवनमूल्य आहे यावर मोठा बनत असतो. प्राचीन काळी आपल्या ऋषिमुनींनी, समाज सुधारकांनी आपल्यासमोर मोठे आदर्श निर्माण करून ठेवलेले आहेत. त्या आदर्शांच्या प्रकाशात प्रजातंत्राच्या वाटेवर चालण्याचा संकल्प करणे हे चिंतन प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### दावोसच्या परिषदेत महाराष्ट्राचे यश

दावोस परिषदेच्या उद्योग करारासाठी मु'यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ गेले. तेथील परिषदेत पहिल्याच दिवशी सुमारे साडेचौदा लाख कोटींचे करार करण्यात आले. या करारामुळे महाराष्ट्रातील उद्योगांना चालना मिळणार असून सुमारे १५ लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. भारतातील उद्योग गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र 'गेट वे ऑफ इंडिया' असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. हरित ऊर्जा, अन्न प्रकि'या, पोलाद निर्मिती, आयटी क्षेत्र, जहाज बांधणी, अशा विविध क्षेत्रांत ही गुंतवणूक आहे. ही गुंतवणूक प्रामु'याने मुंबई, रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात होणार आहे विशेषतः गडचिरोलीसार'या भागात गुंतवणूक होणार असल्यामुळे तेथे विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे तेथील उद्योग वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे जगभरातल्या सर्वच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील गुंतवणुकीला प्राधान्य दिले आहे. आता या पुढील काळ कसोटीचा आहे. येणाऱ्या उद्योगांना आवश्यक सुविधा वेळेवर व दर्जेदार पद्धतीने मिळाल्या पाहिजेत. मु'यमंत्री फडणवीस यांनी याबाबतीत काळजी घेतली जाईल असे सांगितले आहे. एकूणच महाराष्ट्राच्या रोजगार निर्मितीमध्ये या उद्योगांचा मोठा वाटा असणार आहे. महाराष्ट्राचे विकासाचे स्वप्न मु'यमंत्री साकार करत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. देशातील प्रथम क्र'मांकावरचे महाराष्ट्र राज्य विकासाच्या बाबतीत घोडदौड करत आहे.

**शांताराम वाघ**/९८२२९३९२८७

●● ●●

### जबाबदार नागरिक घडले तर राष्ट्र अधिक सक्षम

देश आज ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे. १९५० मध्ये आपल्या देशाला संविधान प्राप्त झाले आणि भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक बनला. हा दिवस केवळ उत्सवाचा नसून, राष्ट्रीय कर्तव्यांची आठवण करून देणारा आहे. विशेषतः, राष्ट्रभक्तीची ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आजची सर्वांत महत्त्वाची जबाबदारी आहे.

## वाचक पत्रे

गेल्या वर्षांत भारताने अनेक सुरक्षा आव्हानांना सामोरे जात धैर्य, संयम आणि काटेकोर तयारी दाखवली. यामध्ये ऑपरेशन 'सिंदूर' ही लक्षणीय घटना ठरली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने केलेल्या या कारवाईत भारतीय सैन्याने अतिशय नेमकेपणा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि धैर्य दाखवून दहशतवादी तळांवर प्रभावी प्रहार केला. या मोहिमेने भारताची सुरक्षा धोरणाबाबतची ठाम भूमिका जगासमोर स्पष्ट केली. देशासाठी लढणाऱ्या सैनिकांचे योगदान अनमोल आहे. सीमांचे रक्षण करताना ते देशाचे स्वातंत्र्य, सुरक्षा आणि आपली भविष्यातील पिढी सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र तत्पर असतात. त्यांचे शौर्य, त्याग आणि निष्ठा हीच राष्ट्रभक्तीची खरी प्रेरणा आहे. राष्ट्रभक्ती केवळ सैन्यापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. घरातून मिळणारे संस्कार, शाळेतून होणारे शिक्षण, संविधानातील मूल्यांचा आदर आणि समाजात नियमांचे पालन, यामधून ती दृढ होते. येत्या पिढीला देशाचा अभिमान, त्याच्या इतिहासाची जाणीव आणि देशहिताचे भान देणे ही आजच्या काळाची गरज आहे. प्रजासत्ताक दिन आपल्याला एकच संदेश देतो-

''जबाबदार नागरिक घडले, तर राष्ट्र अधिक सक्षम होते.''

**राम देशमुख**/नागपूर

●● ●●

### डोनाल्ड ट्रम्प यांचे वर्तन गल्लीतल्या दादासारखे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दावोसला जात असताना त्यांच्या विमानात अचानक बिघाड झाल्याने त्यांना परत फिरवावे लागले. त्यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला पण त्यांनी या बिघाडास इराणला जबाबदार धरले. आपला जीव घेण्यासाठी इराणने आपल्या विमानात बिघाड घडवून असा आरोप करताना असा प्रकार इराणने पुन्हा करण्याचा प्रयत्न केला तर मी इराणचा पूर्ण नायनाट करेन असा सज्जड दम दिला. इराणला दम देण्याआधी त्यांनी ग'ीनलॅण्डवरून डेन्मार्कच्या पंतप्रधानांनाही धमकी दिली होती. त्याआधी मला नोबेल पुरस्कार दिला नाही. आता जागतिक शांततेची मला फिकीर नाही असा दम नॉर्वेच्या पंतप्रधानांना दिला. व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना तर थेट त्यांच्या देशातून उचलून आणून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे हे वर्तन त्यांच्या पदाला शोभणारे नाही. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या देशाचे आपण राष्ट्राध्यक्ष आहोत याचे भान ट्रम्प यांनी ठेवायला हवे. गल्लीतल्या दादाप्रमाणे प्रत्येकाला दम देणे, धमक्या देणे हे त्यांचे काम नाही. आपला देश महासत्ता असून त्या देशाचे आपण सर्वेसर्वा असल्याने वाट्टेल तसे वागण्याचा परवाना आपल्याला मिळाला आहे असा समज ट्रम्प यांचा झाला आहे. त्यांचे हे वर्तन अमेरिकेच्या नागरिकांनाही मान्य नाही. आपल्या अशा वागण्याने अमेरिकेचेच नाव खराब होत आहे हे ट्रम्प यांना कोणीतरी समजावून सांगायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्या देशांना धमक्या, दम देण्याचे सत्र थांबवले नाही तर लवकरच जग युद्धाच्या खाईत लोटले जाईल.

**श्याम ठाणेकर**/९९२२८४६२१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सभापतीच्या निवडीला नाट्यमय घडामोडी

## न.प.सभापतींची निवड दोन दिवस पुढे ढकलली

## महाविकास आघाडीत अंतर्गत गोंधळ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ जानेवारी**

माजलगाव नगर पालिकेच्या विविध समित्यांच्या तसेच सभापती पदाच्या निवड प्रक्रियेबाबत दि.२७ मंगळवार रोजी शहरात मोठी राजकीय हालचाल पाहायला मिळाली. सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत ही निवड प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र महाविकास आघाडीतील अंतर्गत गटबाजी, मतभेद आणि राजकीय कलहामुळे ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊ शकली नाही.

निवड प्रक्रियेदरम्यान नगर पालिकेत मोठ्या प्रमाणात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक नगरसेवकांमध्ये असंतोष दिसून येत होता. या पार्श्वभूमीवर माजलगावचे राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले असल्याचे चित्र दिसून आले. विशेष म्हणजे मोहन जगताप गटाच्या पाच नगरसेवकांनी या निवड प्रक्रियेवर बहिष्कार टाकला. धक्कादायक बाब म्हणजे गटनायकी मान्यता असलेले गटनेतेसुद्धा याच गटात सहभागी असल्याने प्रशासनासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला.

गटनेते उपस्थित नसल्यामुळे व आवश्यक कार्यदेश वेळेत न मिळाल्याने निवड प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले, अशी माहिती सूत्रांनी दिली. तसेच महाविकास आघाडीच्या गटाकडून वेळेत आवश्यक फॉर्म सादर न होऊ शकल्याची देखील चर्चा नगर पालिकेच्या वर्तुळात रंगली होती.

या सर्व घडामोडी लक्षात घेता उपविभागीय अधिकारी गौरव इंगळे यांनी आज होणारी निवड प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आता सभापती तसेच समित्यांच्या निवडीची प्रक्रिया दोन दिवसांनी पार पडणार आहे.

निवड प्रक्रिया पुढे ढकलल्याने शहरातील राजकीय वातावरण आणखी तापले असून पुढील दोन दिवसांत कोणत्या हालचाली घडतात, कोणते नवे राजकीय समीकरण जुळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध

## नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ जानेवारी**



अंबाजोगाई शहरातील पत्रकारांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आज नगराध्यक्ष आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा यांचा सन्मान करण्यात आला.

दीर्घकाळापासून पत्रकार भवनासाठी जागेची मागणी प्रलंबित होती. नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रक्रिया पूर्ण करून यशवंतराव चव्हाण चौक या ठिकाणी असलेल्या अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या लगत जागा उपलब्ध करून दिल्याने पत्रकार वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आसुन नंदकिशोर जी मुंदडा यांनी पत्रकारांची गेल्या अनेक वर्षाची मागणी पूर्ण केल्या मुळे अंबाजोगाई तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नंदकिशोर जी मुंदडा यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी मराठी पत्रकार परिषद हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्तात्रय आंबेकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय रानभरे, तालुका अध्यक्ष प्रशांत लाटकर, सचिव वीरेंद्र गुप्ता, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रकाश बोरगावकर, कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी, हल्ला विरोधी कृती समिती तालुका निमंत्रक अशोक दळवे, गोविंद खरटमोल, व्यंकटेश जोशी, मोहम्मद फैजान, परमेश्वर वैद्य, प्रशांत मस्के, वसुदेव शिंदे, सलीम गवळी आदीसह या कामी पुढाकार घेणारे वाईस ऑफ मीडियाचे अतुल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व उपस्थित पत्रकारांनी नगराध्यक्षांच्या या निर्णयाचे स्वागत करत त्यांच्या कार्याबद्दल आभार व्यक्त केले. पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि सुविधांसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याचे आणि आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या माध्यमातूनच निधी उपलब्ध करून अंबाजोगाई पत्रकार भवनाची भव्य इमारत या ठिकाणी उभी राहील असा विश्वास यावेळी सर्व पत्रकार बांधवांनी व्यक्त केला.

# मुलींनो फक्त शिकू नका, कौशल्य आत्मसात करा, मी पाठीशी आहे–बाळराजे पवार

## सांस्कृतिक उत्सव काळाची गरज – नगराध्यक्षा सौ.गीताभाभी पवार

## नगर परिषदेच्या सांस्कृतिक महोत्सवाला उत्साहात सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२७ जानेवारी**

सामाजिक, सांस्कृतिक आणि, विकासाच्या दृष्टिकोनातून, गेवराई नगर परिषद काम करणार आहे. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पुढचा कार्यक्रम नाट्यगृहात होईल. विषय राजकीय नाही. हे गाव तुमचं आणि आमचं आहे. मुलींनो नुस्त शिकू नका, कौशल्य आत्मसात करा. लहान मोठा – उद्योग करा, व्यवसाय करा, गेवराईची बाजारपेठ आर्थिक राजधानी झाली पाहिजे. मी तुमच्या पाठिशी असल्याची ग्वाही भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना दिली.

नगर परिषदेच्या वतीने आयोजित नगर परिषद सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रम ते बोलत होते. व्यासपीठावर गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्षा गिताभाभी बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, जिल्हा परिषदेचे माजी सभापती युद्धाजीत पंडित, नगर परिषदेच्या उपाध्यक्षा रेवती घुंबार्डे, पोलीस निरीक्षक किशोर पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोठावळे, नपचे गटनेते ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, जिल्हा क्रिडा अधिकारी विद्यागर सोनवणे,भाजपा नेत्या नानी मोटे, वैद्यकीय अधीक्षक कोठावळे, गटनेते शेख खाजाभाई, सर्व नगरसेवक , नगरसेविका, पत्रकार बांधव, नगर परिषदेचे कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेवराई नगर परिषदेच्या सांस्कृतिक महोत्सवाला गुरुवार दि. २७ रोजी सकाळी दहा वाजता मोठ्या उत्साहात सुरू झाली. या महोत्सवात शहरातील विविध शाळांनी रंगीबेरंगी वेशभूषा, देखावे आणि सादरीकरणांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व सामाजिक जाणीवेचे प्रभावी संदेश दिले. गेवराई नगर परिषदेच्या सांस्कृतिक महोत्सवाच्या शोभायात्रेने गेवराईकरांचे लक्ष वेधून घेतले.पुढे बोलताना बाळराजे पवार म्हणाले की, गेवराई शहर व तालुक्यातील विकासासाठी स्वार्थ न सोडता प्रवाहात सामील व्हावे लागेल. गेवराई च्या मातीशी इमान राखून काम करता येईल. गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी स्टडी सेंटर चालू झाले पाहिजेत. हे काम व्हायलाच हवे. समाजाला आपल्या कडून खूप अपेक्षा आहेत. सुरूवात कशी करायची. तुम्ही सांगा, मी तुमच्या पाठिशी आहे. आपण सगळे मिळून काम करू, अहोरात्र परिश्रम करण्याची माझी तयारी आहे. गेवराई ची शैक्षणिक स्पर्धा पुण्याशी करू, यासाठी मार्गदर्शनाची गरज आहे. सामूहिक लढा उभारून गेवराईची बाजारपेठ मोठी करू, असे आवाहन ही, बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना केले. नगराध्यक्षा सौ. गिताभाभी पवार यांनी सांगितले की, गेवराई नगर परिषदेचा महोत्सव विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा असून, लहान वयातली मुले किती सुंदर अभिनय करतात, सामाजिक भान ठेवून एकतेचे संदेश देतात. या गोष्टी आनंद देणार्या आहेत. त्यामुळे, अशा सांस्कृतिक कार्यक्रमाची गरज असल्याचे प्रतिपादन सौ. पवार यांनी, यावेळी बोलताना केले. माजी जिल्हा परिषद सभापती युद्धाजीत पंडित, जिल्हा क्रिडा अधिकारी विद्यागर सोनवणे यांची भाषणे झाली.

या महोत्सवाची सुरुवात भव्य शोभायात्रेने करण्यात आली. विविध विषयावर लक्ष वेधून घेणाऱ्या रंगछटा व सामाजिक संदेशाने संपूर्ण गेवराई शहराचे लक्ष वेधून घेतले. महोत्सवात जिल्हा परिषद कन्या शाळा, जिल्हा परिषद मुलांची शाळा, ईरा पब्लिक स्कूल, सेंट झेवियर्स, विमला विद्या मंदिर, द. बा. घुमरे पब्लिक स्कूल, वसंतराव नाईक आश्रम शाळा, विमला माध्यमिक विद्यालय, राजमाता जिजाऊ विद्यालय, तुळजाभवानी इंग्लिश स्कूल आदी शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूणच, या सांस्कृतिक महोत्सवातून गेवराईच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकासाचा ठोस संकल्प व्यक्त झाला असून, येत्या काळात शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास उपस्थितांमध्ये व्यक्त होत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.प्राची आरडे व शाम वादे यांनी केले. नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी आभार मानले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या वतीने ई कचरा जनजागृती व संकलन अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जानेवारी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या अंतर्गत दिनांक १८जानेवारी २०२६ ते २६ जानेवारी २० २६ या दरम्यान ई कचरा जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात ई -कचरा संकलन केंद्राचे नियोजन करण्यात. अभियानाची सुरुवात दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे , यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ई -कचरा संकलन प्रमुख प्रा. भार्गवराम चौधरी यांनी अभियानाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व सहकारी प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.या अभियानाचा समारोप दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी, कार्यवाह डॉ.अविनाश देशपांडे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, संकलन प्रमुख प्रा. भार्गवराम चौधरी, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा संजय काळे, यांच्या उपस्थितीत झाला. या अभियानामध्ये सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूचे संकलन करण्यात आले यामध्ये संगणक साहित्य, टीव्ही रिमोट मोबाईल चार्जर व जुन्या संपूर्ण इलेक्ट्रॉनिक्स वस्तूची ई कचऱ्यामध्ये नोंदणी केली.या अभियानात ४७ कचरा दात्यांनी एकूण १६ किलोग्रॅम ई कचरा जमा केला. सर्व संस्था पदाधिकारी, सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी यांनी या अभियानात सहभाग नोंदविला.

# राष्ट्रीय सण प्रजासत्ताक दिन आनंददायी व उत्साही वातावरणात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जानेवारी**



दीनदयाल शोध संस्थान संचलित, जन शिक्षण संस्थान व नानाजी देशमुख विद्यामंदिर गोकुळ शिशू वाटिका बीड, यांच्या विद्यमाने ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सात वाजता प्रभात फेरी काढण्यात आली त्यामध्ये विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. त्यानंतर आठ वाजता ध्वजारोहण झाले. सर्वप्रथम भारत माता, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर उपस्थित संस्थेच्या सचिव डॉ. सीमाताई जोशी, डॉ. सुभाष जोशी सर तसेच आजच्या कार्यक्रमाला पाहुणे म्हणून लाभलेल्या सौ.संध्या ताई आयस्कर या महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य आहेत. तसेच जन शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. सत्यभामा चोले ताई, जन शिक्षण संस्थानचे संचालक मा.गंगाधर जी.देशमुख सर, शालेय समिती सदस्य श्रीमती. सुनंदाताई कुलकर्णी, मा सौ. अनिताताई वजुरकर,मा.डॉ. सचिन चोले सर, प्रभाग क्रमांक दहा च्या नगरसेविका सौ. भाग्यश्री ताई तांबारे, मा. अशोक तांबारे सर ,नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. अर्चनाताई मोराळे, गोकुळ शिशू वाटिका प्रमुख सौ. आरती ताई जोशी आदी उपस्थित होते. स्काऊट गाईड संचलनाद्वारे सर्वप्रथम मान्यवरांना मानवंदना देण्यात आली इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोराळे ताई यांनी केले. यानंतर स्वच्छंद गटातील म्हणजे अवघ्या अडीच ते साडेतीन वर्षाच्या विद्यार्थ्यांनी वेशभूषा केलेल्या होत्या त्यामध्ये भारत माता परी कोळेकर, वि.दा.सावरकर शिवतेज परसे, झाशीची राणी श्रुत्वी कुडके, पं.दीनदयाल उपाध्याय प्रियांश धोंडकर, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस शौर्य पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रेयस सतकर, सावित्रीबाई फुले योगेश्वरी डाके इत्यादी.

इयत्ता तिसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी टाळी योग केला *राम* *आयेंगे* *तो* *अंगणा* *सजाऊंगी * या गाण्यावर सादरीकरण केले. टाळी योग केल्याने मेंदूच्या दोन्ही बाजू सक्रिय होतात,एकाग्रता व स्मरणशक्ती वाढते,तणाव आळस दूर होतो ,डोळे हात समन्वय सुधारतो. यानंतर श्रेया औसेकर, श्रावणी शिरसट, संपदा चोले, धनश्री शिंदे, देवयानी कदम, सृष्टी राऊत, स्वरा गीते व हार्मोनियम वर साथ देऊन देव मुळे याने वंद्य वंदे मातरम हे गीत बसवले व गीताचे सादरीकरण सुंदररित्या झाले. त्यानंतर प्रल्हाद गटातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले त्यामध्ये यशवी करे, मनुश्री गायकवाड, गार्गी वखरे, निधीश पांडे, धीरज वाघमारे, रुद्रांश गव्हाणे आदी विद्यार्थी सहभागी होते त्यासाठी क्रांती पोरवाल व जगदाळे यांचे मार्गदर्शन लाभले. यानंतर प्रल्हाद गट,ध्रुव गट, पहिली, दुसरी च्या विद्यार्थ्यांनी हात कवायत सादर केली त्यासाठी स्वातीताई व जगदाळे ताई यांचे मार्गदर्शन लाभले. पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी डंबेल्स सादर केले त्यासाठी अनिताताई मोकाशी, गोसावी ताई, मधुराताई गुळवेलकर यांचे सहकार्य लाभले. तसेच काही विद्यार्थ्यांनी विशिष्ट विषय निवडून भाषणे केली. जसे की, वंदे मातरम सहावीतील आराध्या शेनकुडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. सातवी सृष्टी राऊत, पर्यावरण पाचवी तील सर्वस्वी फसले, नागरी हक्क व कर्तव्य आठवीतील वैभवी बडे.

यानंतर २६ जानेवारी निमित्त काही स्पर्धा घेण्यात आल्या होत्या जसे की लिंबू चमचा, धावणे, संगीत खुर्ची, सामान्य ज्ञान, तीन टांगी दौड, खो-खो त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जल्लोष लोककलेचा आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी के एस के महाविद्यालयातील बालरंगभूमी तर्फे घेण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत सहभागी प्रमाणपत्र मिळवले आहे त्यांचे विशेष कौतुक यासाठी सुरवसे ताई, मोराळेताई, संजना ताई यांचे मार्गदर्शन लाभले. सहावीतील विद्यार्थ्यांनी कलिका तयार केलेली होती त्याचे सादरीकरण मान्यवरांच्या हस्ते झाले कलिकेचा विषय होता ,*प्रजासत्ताक दिन. इयत्ता पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थी यांनी बेटी हिंदुस्तान की या गीतावर लेझीम खेळली त्यासाठी मोराळे ताई,सुरवसे ताई ,नेत्राताई, सोनसाळे ताई, शितल ताई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य लढ्यातील योगदान दिलेल्या थोर नेत्यांचे चित्र संकलन व माहिती याची प्रदर्शनी केली होती मान्यवरांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक देखील केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांसाठी शाळेतील पालक अशोक तांबारे सर यांनी विद्यार्थ्यांना खाऊ दिला. कार्यक्रमाला लाभलेल्या प्रमुख पाहुण्या यांनी खूप छान मार्गदर्शन केले. डॉ.सीमाताई जोशी यांनी अध्यक्षीय समारोप केला. आभार सौ. आरती जोशी यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.जयश्रीताई देशपांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.सीमाताई जोशी, अँड अर्चना ताई तुंगार, देशमुख सर, सुनंदाताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम व्यवस्थित रित्या संपन्न झाला.

# माजलगावमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतावर सामूहिक कवायत



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त शासनाने दिलेला उपक्रमानुसार सामूहिक कवात देशभक्तीवर गीतावर सुंदराव सोळंके महाविद्यालय येथे गटशिक्षणाधीकारी कार्यालय पंचायत समिती माजलगाव यांच्यावतीने सामूहिक कवायतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला .

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी गौरव इंगोले , तहसीलदार संतोष रुईकर, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. के.सानप उपस्थित होते .तालुक्यातील सिद्धेश्वर विद्यालय, राजस्थानी विद्यालय ,महात्मा फुले विद्यालय ,जवाहर माध्यमिक विद्यालय, छत्रपती शिवाजी विद्यालय ,मोरेश्वर विद्यालय, सिंदफणा पब्लिक स्कूल , स्वामी विवेकानंद विद्यालय , या सर्व शाळेतील एक हजार विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेऊन कवायतीचे सादरीकरण केले . यावेळी आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले . तर विभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. संविधान कसे देशासाठी महत्त्वाचे आहे, संविधानावर देश कसा चालतो, निवडणूक कशाप्रकारे घेतली जाते, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र महामुनी यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण पोटभरे यांनी केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील सचिन मोती, संजय राठोड ,रवी आदमाने ,दत्ता कदम, विजय वैरागे, विठ्ठल पवार, नवनाथ चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे चित्रीकरन शिक्षक शेख मतीन यांनी केले . तर कवायतीचे संचलन पंडित मेंडके यांनी केले .

# गजानन विद्यालयाच्या लेझीम पथकाचे पोलीस मुख्यालय बीड येथे उत्कृष्ट सादरीकरण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जानेवारी**

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उत्कृष्ट लेझीम पथकाचे सादरीकरण केले.

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्ह्याचे मुख्य ध्वजारोहण पोलीस मुख्यालय बीड येथे महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक बीड नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी वर्ग यांच्या उपस्थितीत करण्यात आले या कार्यक्रमात जिल्ह्यातून दोन शाळांची निवड करण्यात आली होती त्यामध्ये गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी नवगण येथील विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाने उत्कृष्ट प्रदर्शन केले व मंत्री महोदयांना व जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांना महाराष्ट्राची संस्कृती लेझीम पथकाच्या माध्यमातून उत्कृष्ट कला दाखवून मंत्रमुग्ध केले यावेळी विद्यार्थ्यांना शाब्बासकीची थाप देऊन गुणगौरव करण्यात आला. या ठिकाणी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ व लेझीम पथकातील विद्यार्थी व मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक वृंद यांचे मंत्री महोदयांनी, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी अभिनंदन करून कौतुक केले.

उत्कृष्ट प्रदर्शन केल्याबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर ,युवा नेते रोहित क्षीरसागर,संस्थेचे प्रशासनाधिकारी राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार यांनी लेझीम पथकातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

# सावरकर महाविद्यालयात ‘एकात्म मानव दर्शन’ विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जानेवारी**

येथील स्वा.सावरकर महाविद्यालयात पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या ‘ एकात्म मानव दर्शन ’ या विषयावर दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी दिली. पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या ‘एकात्म मानव दर्शन’ हीरक मेहात्सावा निमित्त या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन स्वा. सावरकर महाविद्यालयामध्ये दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. ‘ एकात्म मानव दर्शन ’ शाश्वत विकास, सामाजिक समरसता व राष्ट्र निर्मितीसाठी मूल्य आधारीत दृष्टीकोन हा चर्चासत्राचा विषय आहे. पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी राष्ट्राच्या सर्वांगीन प्रगतीचा विचार घेऊन ही संकल्पना मांडली या चर्चासत्रामध्ये देशभरातून तज्ज्ञ मंडळी सहभागी होणार आहे. चर्चासत्राला दीनदयाळ उपाध्याय शोध संस्थानचे सदस्य डॉ.उपेंद्र कुलकर्णी, भा.शि.प्र.संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, संस्थेच्या उपाध्यक्षा तथा संकुलाच्या पालक सौ. ज्योतीताई ठाकूर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा.चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ.पी.के.कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे यांची उपस्थिती राहाणार आहे.

# जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांच्यावरील खोटा गुन्हा रद्द करण्याची भाजपची मागणी

## जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षकांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
शासकीय यंत्रणेचा दुरूपयोग करून सुड बुध्दीतून कळमनुरी येथील महसूल सहायकाने भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे यांच्याविरूध्द बीएनएस २०२३ अंतर्गत दाखल केलेला खोटा गुन्हा रद्द करावा तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कळमनुरी येथील महसूल सहायक रविकुमार गंगाधरराव गुठे यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे यांच्याविरूध्द बीएनस अंतर्गत कलम ३५१ (२) आणि ३५२ हा खोटा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्यासह आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, सुरजितसिंह ठाकूर माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी दि २७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात महसूल सहायक रविकुमार गुठे गोदामपाल श्रेणी-३ या पदावर नियुक्ती करण्याचा अधिकार केवळ आकृतीबंधानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांना आहे. परंतु सदर महसूल सहायकाची नियुक्ती स्थानिक स्तरावर तहसीलदार यांनी केल्याचे समजते मात्र तहसीलदारांना अशाप्रकारे पद निर्माण करण्याचा अधिकारच नाही. असे असतांना रविकुमार गुठे यांनी नियुक्तीचे कायदेशीर अधिकार नसतांना गोदामाचा बेकायदेशीर ताबा मिळवला.

यासंदर्भात गजाननराव घुगे यांनी नियुक्तीबाबत आणि गोदामात होत असलेल्या शासकीय मालाची चोरीची विचारणा केली होती. तसेच वेळोवेळी तक्रार अर्ज पुराव्यानिशी दाखल केले होते. हा भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून तसेच स्वत:चे पद वाचविण्यासाठी रविकुमार गुठे यांनी मुद्दाम गोदामात घटली नसून सभागृहात घडली असा बनाव रचला आहे. जेणेकरून कार्यालयातील कर्मचारी यांना व उपस्थितामधील काही व्यक्तींना खोटे साक्षीदार म्हणून उभे करता येईल. या प्रकरणाचे सभागृहातील व गोदामातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करावेत. त्यानंतर सत्य समोर येईल. याशिवाय महसूल सहायक रविकुमार गुठे यांनी त्यादिवशी सभागृहा उपस्थित असल्याचा दावा करणाऱ्या



साक्षीदाराचे सीडीआर व एसडीआर तपासावेत. महसुल सहायक गुठे यांनी बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. वास्तविक अधिकार नसतांना गोदामाचा प्रभार घेणे आणि त्याद्वारे भ्रष्टाचार करणे हा या मागचा उद्देश आहे.

त्यामुळे या प्रकरणाची सखोल उच्चस्तरीय चौकशी करून रविकुमार गुठे यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी तसेच त्याच्या पाठीशी असलेल्यांचा शोध घेवून जिल्हाध्यक्ष घुगे यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा रद्द करावा अशी मागणी भाजपच्यावतीने करण्यात आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**हिंगोली- येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहन केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# आ. मुटकुळे यांच्या निवासस्थानी हळदी-कुंकू संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण असलेल्या मकर संक्रांतीचे औचित्य साधून हिंगोली विधानसभेचे कार्यसम्राट आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी भव्य हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांमधील स्नेहभाव वाढवण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला हिंगोली शहरातील व परिसरातील शेकडो महिलांनी उपस्थिती लावली होती.



हा कार्यक्रम सौ. जनाबाई तानाजीराव मुटकुळे आणि सौ. राजामती शिवाजीराव मुटकुळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. मुटकुळे परिवाराने आलेल्या प्रत्येक सुवासिनीचे स्वागत करून त्यांना तिळगूळ आणि वाण अर्पण केले.

पारंपारिक पद्धतीने पार पडलेल्या या सोहळ्यात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक चर्चा आणि सण-उत्सवाचे महत्त्व सांगण्यात आले. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला असा संदेश देत महिलांनी एकमेकींना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. आमदार निवासस्थान यावेळी महिलांच्या गर्दीने आणि उत्साहाने फुलून गेले होते. या प्रसंगी मुटकुळे परिवारातील सदस्यांसह, परिसरातील प्रतिष्ठित महिला, राजकीय क्षेत्रातील महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम आहेत. हळदी-कुंकू कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे, हाच आमचा उद्देश आहे, असे मत सौ जनाबाई मुटकुळे यांनी व्यक्त केले.



**हिंगोली- शहरातील रिसाला बाजार येथील जिल्हा परिषद डिजीटल शाळा गणेशवाडी येथे पालकमंत्री यांनी भेट दिली. यावेळी वाचनालय व स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के, गटशिक्षणाधिकारी दत्ता नांदे, शिक्षक कुलदीप मास्ट आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

# मुख्यमंत्र्यासोबत बैठकीत पत्रकारांच्या घरांचा मार्गी लावणार- पालकमंत्री



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
येथील पत्रकारांनी वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून शासन व प्रशासनाकडे घरांची मागणी केली आहे, ही मागणी पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत जिल्ह्याच्या लोकप्रतिनिधी व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक लावून जागेचा आणि घरांचा प्रश्न मार्गी लावला जाईल असे अशी ग्वाही अन्न व औषध मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. नरहरी झीरवळ यांनी दिली.

हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहामध्ये दि.२६ जानेवारी सोमवार रोजी पत्रकारांच्या नियोजित पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या वतीने पत्रकारांना जागा व घरे बांधून देण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस आ. तानाजी मुटकुळे, आ. राजू नवघरे, आ.संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जि. प .मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोदवड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहते यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी पालकमंत्री नरहर झिरवळ बोलताना पुढे म्हणाले की, सर्व लोकांचे प्रश्न जिव्हाळ्याने मांडणारे पत्रकार आज पहिल्यांदा स्वत:च्या घरांची मागणी शासनाकडे करत आहेत. ही मागणी पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदारांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक मुंबईत लावून म्हाडा व पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून सोलापूर, नागपुर प्रमाणेच हिंगोली च्याही पत्रकारांना घरे मिळवुन दिल्या जातील अशी मी सर्वांना ग्वाही देतो, पुढे पालकमंत्री म्हणाले की हे घरे बांधण्यासाठी शासकीय जमिनीही उपलब्ध करून दिल्या जाईल तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ जमिनीची निवड करून तसा प्रस्ताव पाठवण्याचे निर्देशही बैठकीत दिले. याप्रसंगी आ.तानाजी मुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बैठक लावून पत्रकारांच्या घराचा प्रश्न तात्काळ मार्गी लावला जाईल असे सांगितले तर आ. राजू नवघरे यांनीही पत्रकारांना सर्व स्तरावर सहकार्य केले जाईल असे सांगितले. सुरुवातीला नियोजित पत्रकार वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी प्रास्ताविकातून इतर जिल्ह्यात कोणत्या योजनेच्या माध्यमातून पत्रकार यांच्या घराचा प्रश्न मार्गी लावण्यात आला तसेच हिंगोली शहरात उपलब्ध असलेल्या जागे संदर्भात सविस्तर मांडणी केली. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत म्हाडा अंतर्गत पत्रकारांना जागा देऊन निवारा द्यावा, ही मागणी केली. यासाठी जिल्हा प्रशासने जागा देऊन मंत्री महोदय व लोकप्रतिनिधींनी शासना कडून हिंगोली मुख्यालय व परिसरातील पत्रकारांना घरे द्यावीत ही मागणी सविस्तर पणे केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रद्युम्न गिरीकर यांनी केले तर शेवटी आभार प्रकाश इंगोले यांनी मानले. पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून पालकमंत्री श्री. झिरवळ व जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांना पत्रकारांना जागा व घरे उपलब्ध करून देण्याची मागणीचे निवेदन देण्यात आले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी सुनील पाठक, विजय गुंडेकर ,सुधाकर वाढवे, राकेश भट, दिलीप हळदे व पत्रकार बांधवांनी परिश्रम घेतले.

# संक्रांतीनिमित्त विधवा महिलांची सेवासदनात आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
संक्रातीचा सण, पौष महीना व रथ सप्तमीचा दिवस हा सर्वत्र हळदी कुंकवाचा आणि सौभाग्याचा प्रतीक म्हणून साजरा केला जातो सगळी कडे हळदी कुंकवाचे कार्यक्रम होत असतात अशा वेळी समाजातील एक घटल मात्र दुर्लक्षित राहतो. तो म्हणजे अशा भगिणी ज्यांच्या डोक्यावरून पतीचे छत्र हरवले आहे. त्यांचा काही दोष नसताना त्यांना या कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. त्याच्यासाठी म्हणून दरवर्षीप्रमाणे सेवासदन हिंगोली च्या सर्वेसर्वा सौ मीराताई कदम व धनराज कदम यांनी तिळगूळ समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमासाठी डॉ. स्वाती यशवंत पवार उपस्थित होत्या त्यांच्या सिद्धी पॅथोलॉजी लॅब च्या वतीने येथे जमलेल्या सर्व भगीनीच्या हिमोग्लोबिन व रक्तगटाची मोफत तपासणी करण्यात आली तसेच त्यांनी सर्व भगिनीना पौष्टीक आहाराचे महत्व पटवून दिले मानसिक स्थैर्य जमवण्यासाठी प्राणायाम व योग शिकण्यासाठी प्रोत्साहन दीले तसेच डॉ. प्रणिता झडपे(स्त्रीरोग तज्ञ) यांनी सर्व भनिनीना गर्भपिशवी कॅन्सर व ब्रेस्ट कॅन्सर या आजारावर सविस्तर माहीती दिली. यावेळी विधवा महिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.



# हिंगोलीत लोकधर्म सामाजिक संघटनेची स्थापना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
स्वराज्य, संविधानातील मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून समाजात समता, न्याय व बंधुता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने लोकधर्म सामाजिक संघटनेची अधिकृत स्थापना करण्यात आली. यावेळी लोकधर्म सामाजिक संघटनेच्या नाव व अधिकृत बोध चिन्ह यांचे अनावरण करण्यात आले.

स्वराज्य, संविधान, स्वातंत्र्यावर आधारित समता, बंधुता व न्याय ही मूल्ये तसेच लोकसेवा, लोकशक्ती व लोकराज्य या तत्त्वांवर आधारित ही लोकधर्म सामाजिक संघटना कार्य करणार आहे, सामाजिक, शैक्षणिक, संविधानिक जनजागृती महिला सक्षमीकरण, मागास घटक यांच्या हित यावर भर देण्यात येणार आहे.अनावरण करण्यात आलेले बोधचिन्हहा सर्वधर्मीय विचार, लोकशाही मूल्ये आणि समाजहिताचे प्रतीक असून संघटनेच्या ध्येयधोरणांचे दर्शन घडवणारा आहे. सदर लोकधर्म सामाजिक संघटना कोणत्याही जात, धर्म किंवा पंथाच्या विरोधात नसून स्वराज्य, संविधान सर्वोच्च मानून सर्वसामान्य नागरिकांचे हक्क, कर्तव्ये व सामाजिक न्यायासाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने कार्य करणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या लोकधर्म सामाजिक संघटनेच्या माध्यमातून सामाजिक संवाद, कायदेविषयक जनजागृती, लोकशाही मूल्यांचे संरक्षण तसेच लोकहिताचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन दिलीप चव्हाण, उद्घाटक म्हणून ॲड.पद्माकर पुरी, प्रमुख अतिथी म्हणून खंडेराव सरनाईक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे ॲड. मनिष साकळे, प्रा.विक्रम जावळे, डॉ.सतिश पाचपुते, डॉ.मंगेश टेहरे, डॉ.यशवंत पवार, डॉ.अखिल अग्रवाल, छगन बनसोडे, योगाजी मुळे, प्रा.डॉ.शत्रुघन जाधव, अनवर हमीद शेख, कैलास भुजंगळे, प्रा.डॉ.सुखदेव बलखंडे, पंडित अवचार, प्रा.बंकट यादव, प्रा.डॉ.किशोर इंगोले, ॲड.सुभाष वाघमारे, ॲड.पंजाब चव्हाण, ॲड.सुरेश गडदे, मोहम्मद आसिफ गौरी, त्र्यंबक पोघे, प्रा.सुधाकर इंगोले, डॉ.अभयकुमार भरतिया, राजकुमार वायचाळ, प्रा.विजयकुमार कांबळे तर संघटनेचे सल्लागार म्हणून प्रा.बाबासाहेब इंगोले, सचिन जायभाये होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वजीत घोडगे, प्रास्ताविक प्रा.बाबासाहेब इंगोले, आभार सचिन जायभाये यांनी मानले.

# नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर यांचेहस्ते नगर पालिकेत ध्वजारोहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त हिंगोली नगरपरिषदेच्या वतीने नगरपरिषद कार्यालय परिसरात अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. हिंगोली नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. रेखा श्रीराम बांगर यांच्या शुभहस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले.



ध्वजारोहणानंतर नगराध्यक्षांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या प्रसंगी शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याची भावना उपस्थित लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपनगराध्यक्ष माबूद बागवान, गटनेते श्रीराम बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्यासह नगरपालिकेचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकारी आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी एकत्र येत शहराच्या सर्वांगीण प्रगतीचा संकल्प यावेळी केला.

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी उपस्थित नागरिकांनी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. नगरपालिकेचा परिसर आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांनी सजवण्यात आला होता, ज्यामुळे वातावरणात चैतन्य पसरले होते.

# स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जानेवारी**
शहरातील आदर्श कॉलनी भागातील 'गुरू ग्लोबल इंग्लिश स्कूल' येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि २६ जानेवारी रोजी आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी प्रेक्षकांची मने जिंकली वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाल्यानंतर बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शाळेचे संचालक राजेश इंगोले पाटील यांचा हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी शाळेतील शिक्षिका अर्चना इंगोले पाटील वैष्णवी नायक पूजा गरवारे मीनाक्षी बुद्रुक प्रिया मस्के उपस्थित होते. डान्स स्पर्धे मध्ये प्रथम वेदांगी गरवारे, रिद्धी सोळंके गौरी तावरे हिंदवी शिंदे आदींनी बक्षीस मिळवले.

# जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव कटिबध्द : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ जानेवारी-**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे झेंडावंदन आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे संपन्न झाले. यावेळी त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी मी सदैव कटिबध्द असून विविध विकास कामावर भर देण्यात येणार असल्याचे असल्याचे प्रतिपादन केले. आजचा प्रजासत्ताक दिन देशभक्तीपर गीतावर शालेय विद्यार्थ्यांच्या कवायतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव तिडके, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहायक जिल्हाधिकारी अनन्या रेड्डी,अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी जिल्हाधिकारी किरण अंबेकर, वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र सैनिक, वारसपत्नी आणि जेष्ठ सन्माननीय



नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांनी उपस्थित मान्यवरांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ध्वजवंदनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारस पत्नींची भेट घेतली. पालक मंत्र्यांसोबत जिल्हाधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. आज सकाळी ९.१५ वा. पालकमंत्री अतुल सावे यांनी ध्वजवंदन केले. त्यानंतर पोलीस वाहनातून त्यांनी संचलन करणाऱ्या पथकांचे निरीक्षण केले.

नांदेड येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा ३५० वा शहीदी समागम कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन गुरुद्वारा बोर्ड, जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन, मनपा प्रशासन, नामलेवा संगत व इतर ९ समाजाच्यावतीने यशस्वीरित्या केल्यामुळे पालकमंत्री श्री. सावे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

शासनाच्यावतीने नेहमीच शेतकऱ्यांच्या व सामान्यांसह हिताच्या योजना राबविण्यावर भर देण्यात येत असून जून ते सप्टेंबर २०२५ या काळात जिल्ह्याला नैसर्गिक आपत्तीमुळे खूप मोठे नुकसान झाले होते. या नुकसान झालेल्यांना भरपाईसाठी ६२८ कोटी ९८ लाख रुपये रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच रब्बी हंगामासाठी बियाणे व इतर अनुषंगिक बाबीसाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना डीबीटीद्वारे ७२७ कोटी ९३ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत महाविस्तार एआय पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतमालाचे बाजारभाव, हवामानाचे संदेश, इ. माहिती मिळणार आहे. यामुळे या पचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यात १ लाख जलतारा तयार करण्यात येणार असून, येत्या काळात नांदेड जिल्हा पाणीदार होणार आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीने १५० दिवसांच्या उपक्रमात विविध लोकाभिमुख, गतीमान उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व सुविधा व उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असेही आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील पंचायतराज संस्थाना अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज हे महत्वाकांक्षी अभियान राबविण्यात येत आहे. लोकसहभागाच्या माध्यमातून हे अभियान यशस्वी करावे असेही आवाहन पालकमंत्री श्री. सावे यांनी केले.

महाराष्ट्र सरकारने डिसेंबर २०२५ मध्ये सौर ऊर्जेच्या क्षेत्रात एक ऐतिहासिक कामगिरी करत जगात गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवले आहे. महावितरणने अवघ्या ३० दिवसांत ४५ हजार ९११ ऑफ-ग्रीड सौर कृषीपंप बसवून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

नांदेड जिल्हा पोलीस प्रशासनाकडून एमपीडीए अंतर्गत ४१ कारवाया करत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकाविला असून, जिल्ह्यातील अवैध धंद्यावर आळा बसविण्यासाठी ऑपरेशन फ्लश ऑऊट राबविण्यात येत आहे. पोलीस प्रशासनाच्यावतीने महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**देशभक्तीपर गीतावर शालेय मुलांची कवायतीने वेधले सर्वांचे लक्ष**

शिक्षण विभागाच्यावतीने देशभक्तीपर गीतावर शालेय विद्यार्थ्यांचे शिस्तबध्द कवायतीचे सादरीकरण पोलीस कवायत मैदानावर केले. या कवायतीत प्रत्यक्ष पालकमंत्र्यासह इतर मान्यवरांनी सहभाग घेतला. या तालबध्द कवायतीनी सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेत सर्व वातावरण देशभक्तीमय केले.

आजच्या परेडचे नेतृत्व परिविक्षाधीन पोलीस अधिक्षक शशांक गौडा यांनी तर सेंकड इन परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक विजयकुमार धोंडगे केले. प्लाटून मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलीस बलाचे प्लाटून कमांडर केंद्रीय पोलीस उपनिरीक्षक देविदास जाधव, जलद प्रतिसाद पथकाचे पोलीस उपनिरीक्षक गोविंद बडगिरे, दंगा नियंत्रण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण औटे, पोलीस मुख्यालय पथकाचे पोलीस उपनिरीक्षक निखील पोटे, दंगा नियंत्रण महिला पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्रीमती अनिसा सय्यद, गृहरक्षक दल पथक (पुरुष) वरिष्ठ प्लाटून नायक बळवंत अटकोरे, गृहरक्षक दल पथक (महिला) श्रीमती मंगल बराटे, राष्ट्रीय छात्रसेना पथकाच्या आराध्या चव्हाण, स्काऊट व गाईड पथकाच्या प्रतिक्षा मस्के, केंद्रीय विद्यालय चि. वरप्रसाद, पोलीस बँड पथकाच्या श्रेणी पो. उपनिरीक्षक बी. आर. वाघमारे व सहकारी कर्मचारी, डॉग स्कॉर्ड युनिट श्वानाचे नाव डेक्सटर पो.हे.कॉ वाहेद बेग, डॉग हॅंडलर, बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे राजकिरण सोनकांबळे, वाहन चालक प्रवीण चंदेल, दंगा नियंत्रण वाहन (वज्र वाहन) वामन पारडे, वाहन चालक बालाजी ठाकूर, अग्निशमक वाहनाचे अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे, फायरमेन शाहरुख पठाण, चालक एस. पी. तोटावाड, १०८ रुग्णवाहिकाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुदर्शन सुर्यवंशी चालक सतीश बेरडे यांचा तर लोकशाहीचा चित्ररथामध्ये उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांचा या संचलनात सहभाग होता.

**पालकमंत्री यांच्या हस्ते क्रीडा पुरस्कार व निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सत्कार**

थेलेटीक्स (भालाफेक व गोळाफेक) ऑलम्पीक गेम मध्ये श्रीमती भाग्यश्री माधवराव जाधव, योगासन एशियन योगासन श्रेयस दिलीप मार्कंडेय यांना, बॅडमिटन राष्ट्रीय पॅरा बॅडमिटन मध्ये विजयी झालेल्यांना प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह देवून सन्मान करण्यात आला. संविधान दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धे तील निवड झालेल्या अंजली प्रवेश लोखंडे यांचा प्रथम तर रुमाले प्रियंका गौतम यांचा द्वितीय, प्रतिक्षा विठ्ठल मुनेश्वर यांचा तृतीय क्रमांक आल्याबाबत त्यांना रुपये ३ हजार रुपयांचा धनादेश व गुलाब पुष्प देवून सत्कार करण्यात आला. योगाचार्य सिताराम सोनटक्के यांचा योग प्रसाराबाबत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रविंद्र पांडागळे व अक्षय ढोके यांनी केले.

## राष्ट्रीय कुटूंब अर्थ सहाय्य योजनेअंतर्गत माहूर तालुक्यात १ लाखाचे अनुदान

**माहूर-** महाराष्ट्र राज्याचे सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना



व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. द्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पात्र लाभार्थ्यांना एका लाखाचे अनुदान वाटप करण्यात आले. शासन निर्णय क्रमांक : राकुला-२०१२/ प्र.क्र.२७७/विसयो-२, मंत्रालय मुंबई, दि. २१ नोव्हेंबर २०१३ अन्वये दारिद्रय रेषेखाली नोंद असलेल्या कुटूंबातील १८ ते ५९ वयोगटातील कोणतीही कमावती व्यक्ती मृत्यू पावल्यास त्यांच्या कुटूंबियास राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो. त्यानुषंगाने माहूर तहसिल कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जानुसार ०५ पात्र लाभार्थी चंद्रकला राजू नल्लावार रा. गोंडवडसा, मुकिंदा दाऊ कानिंदे रा. पडसा, संगीता मारोती पवार रा. इवळेश्वर, गणपत भिमा मडावी रा. म.पार्डी, हसीनाबी शे. मेहबूब रा. माहूर प्रत्येकी रु. २० हजार याप्रमाणे रु. १ लाख रुपयांचे अनुदान पी एफ एम एस प्रणालीद्वारे त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार अभिजीत जगपात यांनी दिली आहे. तसेच माहूर तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी योग्य त्या कागदपत्राची पुर्तता करुन राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे. याकामी संगांयो विभागाचे नायब तहसीलदार श्रीमती. अरुणा सुर्यवंशी, महसूल सहायक वैभव पांढरे, आय. टी. असिस्टंट उदय वानखेडे यांनी परिश्रम घेतले.

## सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती कंधारच्या अध्यक्षपदी विनोद तोरणे

**कंधार-** शासकीय विश्रामगृह कंधार येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ ची बैठक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे माजी अध्यक्ष धनराज पाटील लुंगारे (बाळू पाटील) यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच



संपन्न झाली या बैठकीत संभाजी ब्रिगेडचे माजी सचिव विनोद पाटील तोरणे यांची शिवजन्मोत्सव सोहळा समिती च्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह कंधार येथे शहरामध्ये दरवर्षीप्रमाणे १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते ही बैठक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे माजी अध्यक्ष बाळू पाटील लुंगारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकीत १९ फेब्रुवारी २०२६ रोजी साजरा होणारा शिवजन्मोत्सव सोहळ्या विषयी विविध विषयावर चर्चा होऊन जन्मोत्सव सोहळ्याच्या अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेडचे माजी जिल्हा सचिव विनोद पाटील तोरणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली व उर्वरित कार्यकारणी निवडीची बैठक दिनांक २९ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह कंधार येथे दुपारी तीन वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीला धनराज पाटील लुंगारे , नामदेव कुट्टे , बळीराम पाटील पवार , नितीन पाटील कोकाटे , परमेश्वर पाटील जाधव , संदीप पाटील तोंडचिरे , प्रदीप पाटील हुंबाड, अमित पाटील मोरे , विकास पाटील गारोळे, शहाजी पाटील शिंदे , अंकुश पाटील कदम, सौरभ मोरे , संतोष बोरोळे, डी जी जाधव, त्रिभुवन मोरे, शाहरुख शेख , कैलास पाटील पवळे ,विष्णू पाटील जाधव, ज्ञानेश्वर पाटील तेलंग ,विकास पाटील लुंगारे यांच्यासह तालुक्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐकलव्य निवासी अंध विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**बाऱ्हाळी -** येथील एकलव्य निवासी अंध विद्यालयात येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेचे सचिव नि.म.वडगावकर गुरुजी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर वर्षात शालेयस्तरावर विविध स्पर्धा उपक्रम राबविण्यात आली होती त्यात यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना फळे,खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी ऐकलव्य निवासी अंध विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ,पालक ,नागरिक उपस्थित होते.

## राष्ट्रीय महिला बौद्ध धम्म परिषद

**देगलूर -** देगलूर येथील जेतवन शैक्षणिक, सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट सुजायतपूर यांच्या तिसरी अखिल भारतीय राष्ट्रीय महिला बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही बौद्ध धम्म परिषद महिलांचा मानसन्मान, पुरस्कार, न्याय, हक्क आणि धम्म चळवळीला दिशा देणारी ठरली.

## विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत लोकार्पण

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ जानेवारी-**

नांदेड जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या निधीतून जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत असलेल्या विष्णुपुरी पशु वैद्यकीय दवाखाना इमारत लोकार्पण सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी डॉ.संतबाबा हरजिंदरसिंघ व राजेजी रामा गयानोजी ठाकूर व सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व ऊपसरपंच सौ. अर्चना विश्वनाथ हंबर्डे ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत पार पडला.

जिल्हा नियोजन विकास कार्यक्रम अंतर्गत विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत पाच खोल्यांचे बांधकाम असलेली इमारत ही ११ गावातील पशुधनाचा उपचार व संगोपनासाठी असून या इमारतीच्या लोकार्पण सोहळा डॉ.संतबाबा हरजिदरसिंघ दिनांक २६ जानेवारी रोजी संपन्न झाला, यावेळी ध्वजारोहण सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांच्या हस्ते करण्यात आले तर उपस्थितांचे स्वागत पशुधन वैद्यकीय अधिकारी राजेश्री जाधव यांनी केले.यावेळी सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, ऊपसरपंच विश्वनाथ




हंबर्डे, सोमभारती महाराज, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे,लक्ष्मण ठाकूर,प्रकाश हंबर्डे,माजी सरपंच संतोष बारसे, माजी सरपंच जनाबाई शेबोले, मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव, भगवान सोळंके,चांदु वाहुळकर, संतोष हंबर्डे, माधवराव हंबर्डे,राजु हंबर्डे ,बालाजी हंबर्डे,विलास भोसले, नारायण कांबळे,नारायण हंबर्डे,अमृतराव हंबर्डे ,पोलीस पाटील प्रविण हंबर्डे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे यांच्या सहग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन झालेल्या इमारती मुळे पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत जवळपास अकरा गावातील ग्रामस्थांचा पशुधनावर उपचार व संगोपनासाठी मदत होणार आहे.

## जवळगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांची उसळली गर्दी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २४ जानेवारी-**

माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांचा वाढदिवस दरवर्षीत कार्यकर्ते मोठ्या उत्साहात साजरा करतात यावर्षी सुद्धा कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी मतदार संघातील दोन्ही तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जवळगाव येथे उपस्थित होते. अभिष्टचिंतन करण्यासाठी नगरपरिषदेचे गटनेते अमित आरसूळ, नगरसेवक अजय सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष शिवा चंदेल, संदीप शिंदे, शेख कलीम, फिरोज पठाण, इरफान पठाण, काँग्रेसचे युवा नेते संदीप सोमुले, संतोष भोसकर, विष्णू सुकळकर, राहुल बहादुरे, सरपंच संघटनेचे माजी अध्यक्ष अनिल पवार, विलास चव्हाण उंचाडकर यासह काँग्रेसचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील अडीच दशकापासून माधवराव पाटील जवळगावकर हे राजकारणात सक्रिय असून दोन वेळा त्यांनी हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे



नेतृत्व केले तर मागील काळात त्यांच्या मातोश्री यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद भूषवले होते, सत्ता असो अथवा नसो राजकारणाच्या केंद्रस्थानी जवळगावकर हे नेहमीच राहिलेले आहेत स्वतः सत्तेत नसले तरी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेत अनेक वेळा एक हाती विजय मिळवला हे सर्वश्रुत आहे. नुकत्याच पार पडलेल्या पालिका निवडणुकीत त्यांनी हिमायतनगर नगरपंचायतीवर काँग्रेसचा झेंडा फडकवला तर हदगाव पालिकेत पाच नगरसेवक निवडून आणले व महाविकास आघाडी करून एक क्रॉप मेंबर आपल्याकडे घेत पालिकेत सदस्य संख्या सहावर नेली.

मतदार संघात जवळगावकर कुटुंबियांना मानणारा मोठा वर्ग असून प्रत्येक गावागावात तांड्या वस्तीत मोठ्या प्रमाणात चाहता वर्ग आहे त्यामुळेच सत्तेत नसताना देखील प्रचंड कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जवळगावकर यांचा वाढदिवस साजरा होतो.

**नगरसेवक अजय सूर्यवंशी यांच्याकडून श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रतिमा भेट**

लोकनेते तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर हे श्री स्वामी समर्थ महाराजांचे भक्त असून ते स्वामींची नितांत भक्ती करतात त्यामुळे त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगरसेवक अजय सूर्यवंशी यांनी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांना वाढदिवसानिमित्त श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती भेट देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले यावेळी त्यांची पालिकेतील सर्व टीम यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रभाग क्रमांक पाचच्या फेर मतमोजणीसाठी न्यायालयात इलेक्शन पिटीशन दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ जानेवारी-**

प्रभाग क्रमांक पाचच्या मतमोजणीमध्ये तफावत असल्याची तक्रार करत फेर मतमोजणी घेण्यात यावी व टॅली शीट देण्याज यावी यासाठी एमआयएमच्या उमेदवार प्रज्ञा बाबासाहेब सूर्यवंशी यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

नांदेड महापालिका निवडणुकीसाठी दि. १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली तर दि. १६ जानेवारी रोजी मतमोजणी झाली. या मतमोजणी दरम्यान प्रभाग क्रमांक पाच (अ ) मधील उमेदवार एमआयएमच्या उमेदवार प्रज्ञा बाबासाहेब सूर्यवंशी यांनी मोजणी प्रक्रियेत तफावत असल्याची तक्रार करत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आक्षेप दाखल केला होता. परंतु या अर्जावर कुठल्याही प्रकारची चौकशी न करता सदरील अर्ज रद्द करण्यात आला. हा प्रकार अन्यायकारक असून फेर मतमोजणी घ्यावी व टॅली शीट द्यावी अशी मागणी उमेदवार प्रज्ञा सूर्यवंशी यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व मनपा आयताकडे केली. मनपा आयुक्तांनी न्यायालयात जाण्याचे लेखी सुचवल्याने उमेदवार प्रज्ञा सूर्यवंशी यांनी इलेक्शन पिटीशन १/२०२६ नांदेड जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केली आहे

## पीएमश्री केंद्रीय विद्यालय मुदखेड येथे जिल्हास्तरीय प्रश्नोत्तरी स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ जानेवारी-**

मुदखेड येथील पी एम श्री केंद्रीय विद्यालय सीआरपीएफ मुदखेड येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती पराक्रम दिनानिमित्त परीक्षा पे चर्चा या प्रधानमंत्री मोदीजींच्या उपक्रमांतर्गत ऑपरेशन सिंदूर व स्वदेशी या विषयांवर जिल्हास्तरीय प्रश्नोत्तरी चे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालय नांदेड, केंद्रीय विद्यालय मुदखेड, जवाहर नवोदय विद्यालय शंकर नगर तसेच इतर सीबीएससी व राज्य शासनाच्या शाळांचा सहभाग होता. या स्पर्धेमध्ये मध्य चरण (वर्ग ६ ते ८) मधील जवळपास ५० तसेच माध्यमिक चरण (वर्ग ९ ते १२) मधील जवळपास ५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या स्पर्धे तील दोन्ही चरणांमधील तीन-तीन विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजय चौकीकर व प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक पांडुरंग फाजगे हे उपस्थित होते.

## मांडवा -नागझरी-झेंडिगुडा बस सेवा तात्काळ सुरू करण्याची आ.केराम यांच्याकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ जानेवारी-**

मांडवा, नागझरी व झेंडिगुडा ही आदिवासी व ग्रामीण भागातील गावे असून या परिसरातील नागरिकांसाठी दळणवळणाची सुविधा अत्यंत तोकडी आहे. या मार्गावर नियमित बस सेवा नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता मांडवानागझरीझेंडिगुडा ही बस सेवा तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जिल्हा उपाध्यक्ष महिला मोर्चा भाजपा,किनवट यांच्या वतीने सागरताई शिंदे यांनी आमदार भीमराव केराम यांना निवेदन सादर केले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बस सेवा



नसल्यामुळे शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच शेतकरी व कामगार वर्गाला शिक्षण, उपचार व दैनंदिन प्रवासासाठी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

मांडवानागझरीझेंडिगुडा हा मार्ग सुरू झाल्यास परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळेल. त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे (एस. टी.) पाठपुरावा करून सदर बस सेवा तात्काळ सुरू करण्याबाबत आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी सुनिता मुंडे, रमाबाई सानप, वंदना कुमरे, सरस्वती आत्राम, ज्योतीताई साळवे पाटील, अजय शिंदे पाटील, दीपक शिंदे, अनिरुद्ध केंद्रे, चंद्रकांत साळवे पाटील आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत इच्छुकांची विक्रमी गर्दी होणार!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २४ जानेवारी-**

केंद्रात भाजप, राज्यात भाजप आणि आता स्थानिक स्वराज्य संस्थेतही भाजप ही केवळ घोषणा न राहता वास्तवात उतरल्याचे चित्र अलीकडील नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकांतून स्पष्ट झाले आहे. जनतेने भाजपाच्या बाजूने दिलेल्या निर्णायक कौलामुळे पक्षाचा आत्मविश्वास कमालीचा वाढला असून, त्याचा थेट परिणाम आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर होताना दिसत आहे.

नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकांतील घवघवीत यशानंतर भाजपामध्ये इच्छुक उमेदवारांची अक्षरशः उसळलेली लाट पाहायला मिळत आहे. भाजपाच्या तिकीटावर निवडणूक लढवली तर विजय सहज शक्य आहे, असा समज राजकीय वर्तुळात बळावत असून, त्यामुळे इतर पक्षांतील अनेक इच्छुक भाजपाच्या वाटेवर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, पक्षांतराच्या चर्चांना उधाण येण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली असून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षांना मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नांदेड जिल्ह्यात भाजपासाठी 'ट्रम्प कार्ड' ठरले अशोकराव चव्हाण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरात राजकीय वातावरण ढवळून काढले असताना, नांदेड जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे भाजपासाठी पुन्हा एकदा 'ट्रम्प कार्ड' ठरल्याचे चित्र दिसून येत आहे. या नव्या राजकीय समीकरणामुळे नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत भाजपाच्या गोटात इच्छुकांची गर्दी वाढणे अटळ मानले जात आहे. देगलूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात भाजपाची तिकीटे मिळवण्यासाठी चुरस निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

**आ. जितेश अंतापुरकरांना 'हिरो' होण्याची सुवर्णसंधी!**

देगलूरबिलोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर यांच्यासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. मागील देगलूर नगरपरिषद निवडणुकीत प्रचार यंत्रणा आणि नियोजन सपशेल अपयशी ठरल्याने भाजपाला एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यामुळे आमदार अंतापुरकरांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते.

**भाजपाच्या विजयाचे 'साइड इफेक्ट'**

मात्र आता येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आमदार अंतापुरकरांसाठी आव्हानासोबतच मोठी सुवर्णसंधी ठरू शकते. देगलूर तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट व १० पंचायत समिती गण या निवडणुकांत परिपूर्ण नियोजन, योग्य उमेदवारांची निवड आणि संघटनात्मक एकजूट साधता आली, तर भाजप सर्वाधिक जागेवर विजय मिळवू शकतो. जुनानवा भाजप असा अंतर्गत वाद बाजूला ठेवत साथ चलोची भूमिका घेतली, तर आमदार अंतापुरकर हे या निवडणुकीत 'हिरो' ठरू शकतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. जिल्ह्यातील राजकारणाची सूत्रे हाताळणारे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण आणि राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी रणनीती आखल्यास देगलूरच्या राजकारणात भाजप मोठी झेप घेऊ शकतो. एकंदरीत, भाजपाच्या विजयाचा हा 'साइड इफेक्ट' आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत राजकीय समीकरणे बदलणारा ठरणार, हे मात्र निश्चित!

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** लातूर शहरातील विशालनगर परिसरातील साई मंदिर समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्यानी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

या प्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थी, सर्व शिक्षिकांची उपस्थिती होती. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी प्ले ग्रुप क्लासमधून सई संदीप मोहिते - प्रथम, धार्मिका सतलिंग बुलबुले - द्वितीय, नर्सरी क्लासमधून अद्वैत सुरज खंडागळे, श्रीजा धनंजय देलमोडे - प्रथम, रुशांक रामराजे तेले, शौर्य सदाशिव कांबळे - द्वितीय, प्रीशा प्रवीण यादव, रीयांशी बसवेश्र्वर आलमले - तृतीय यासह अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये चिमुकल्यांनी त्यांच्या वक्तृत्वाचे खूपच उत्तमरित्या सादरीकरण केले. या कार्यक्रमाला बहुसंख्य पालक उपस्थित होते. याप्रसंगी श्रीकृष्ण लाटे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.


# शेतकरी आत्महत्या तंत्र आणि संघटनाच्या अभावामुळे होतात : पद्मश्री डॉ. दादा लाड

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** शेतीमुळे शेतकरी आत्महत्या करतात असे म्हणणे शेतीला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. कापूस असो वा अन्य पीक त्याच्या उत्पादन वाढीसाठी योग्य त्या तंत्राचा अवलंब करणे गरजेचे असते. तंत्र आणि संघटनाच्या अभावामुळे खचून गेल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून एवढे टोकाचे पाऊल उचलणे योग्य नसल्याचे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार घोषित झालेले भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ नेते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक डॉ. दादा लाड यांनी 'दैनिक सोलापूर तरुण भारत' शी बोलताना केले.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस पद्मश्री पुरस्कार घोषित झालेल्या डॉ. श्रीरंग उर्फ दादा लाड यांच्याशी लातूरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'माधव स्मृती' कार्यालयात सोमवारी प्रस्तुत प्रतिनिधीने सुसंवाद साधला. निःस्पृह कर्मयोगी डॉ. दादा लाड मागच्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आणण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत. कापसाच्या उत्पादन तंत्रात बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या तंत्राने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. भारतीय किसान संघाच्या माध्यमातूनही त्यांनी कृषी क्षेत्रात अमुलाग्र कार्य केले आहे. आजही वयाची आठ दशके उलटूनही त्यांचा उत्साह तरुणांना लाजवणारा असा आहे. किसान संघाचे संघटन आजमितीस बाल्यावस्थेत आहे. हे संघटन मजबूत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत, असे सांगून डॉ. दादा लाड म्हणाले की, शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही, ह्या कारणावरून शेतकरी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलतात,असे होत नाही.

शेतकरी संघटित झाल्याशिवाय सरकार शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देऊ शकत नाही. म्हणूनच आजपर्यंत अनेक सरकारे आली - गेली, पण शेतकऱ्यांचा प्रश्न आहे तसाच आहे. शेतकऱ्यांना चांगल्या भावासोबतच त्यांच्या



उत्पन्नातही वाढ होणे आवश्यक आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या तंत्रानुसार कापसाची लागवड केल्यास उत्पादनात वाढ होऊ शकते.

मराठवाड्यातील शेतकरी भावूक आहे. दरवर्षी आषाढी वारीला आठ दहा लाख लोक जातात. यामध्ये शेतकऱ्यांची संख्या जास्त असते. एवढ्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचे संघटन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर झाल्यास शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक गतीने होऊ शकते. एखाद्या वर्षी शेतकरी आषाढी वरील जाण्याऐवजी एवढ्या मोठ्या संख्येने मुंबईला मोर्चा काढला तर त्याचा कायमसाठी फायदा होऊ शकतो, असेही डॉ. लाड म्हणाले.

मराठवाड्यातील जमिनीला जास्त पावसाची गरज नाही. फक्त शेतकऱ्यांनी विकसित तंत्राचा अवलंब केल्यास शेतकरी निश्चित आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात. कापूस उत्पादनात वाढ करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना शिकविले गेल्यास त्याचा होऊ शकतो. आपल्याला मिळालेल्या या पुरस्कारामुळे आपले तंत्र जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचणार आहे. परिणामी शेतकरी राजा खऱ्या अर्थाने आर्थिक दृष्टया सक्षम होणार आहे. या तंत्राची प्रसिद्धी आता सरकारने मोठ्या प्रमाणात करावी. जेणेकरून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्र पोहोचेल. आपल्याकडे त्रेता युगापासून कापसाचे उत्पादन होते. हे उत्पादन वाढीसाठी तंत्र विकसित होणे आवश्यक होते. शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे मागणी करूनही हमीभाव मिळत नाही. हमीभाव न मिळणे याकरिता शेतकऱ्यांत शक्ती आणि संघटनाचा अभाव कारणीभूत आहे. भारतीय किसान संघ शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम करत आहे. मात्र संघर्ष ही काही किसान संघाची प्रवृत्ती नाही.

शेतकऱ्यांना हमीभाव मिळवण्यासाठी सर्वप्रथम त्यांचे संघटन वाढले पाहिजे. हे संघटन वाढल्यास शेतकऱ्यांना हमीभावासाठी सरकारला विनंती करण्याची गरज पडणार नाही तर आदेश देता येऊ शकेल असेही त्यांनी बोलून दाखवले. आपल्याला पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचा व्यक्तिगत आनंद झाला नाही. मात्र, शेतकरी या तंत्राचा अवलंब करून आपल्या उत्पादनात वाढ करू शकेल याचा आनंद अधिक झाल्याची प्रांजळ भावना डॉ. लाड यांनी व्यक्त केली. कापसाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी २६ वर्षांपासून आपण करत असलेल्या संशोधनाचा फायदा आता जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणर आहे, याचा आपल्याला मनस्वी आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

## शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** राष्ट्र प्रथम अभियानांतर्गत शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. मुली स्वसंरक्षण करण्यास सक्षम व्हाव्यात म्हणून हा निर्णय घेतला असून, माजी सैनिकांकडून सैनिकी धडेही दिले जाणार आहेत.

शालेय शिक्षण विभागाचा हा निर्णय अत्यंत चांगला असून, पालक, विद्यार्थ्यांतून याचे स्वागत होत आहे. हल्ली शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना स्वतःचे संरक्षण करता आले पाहिजे. त्या बाहेर वावरताना सक्षम असल्या पाहिजेत. यासाठी शालेय शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून, प्रबोधनकारामार्फत विद्यार्थ्यांत राष्ट्रीय विचार आणि व्यक्तीमत्व विकासासाठी मार्गदर्शनही केले जाणार आहे.

प्रशिक्षणात शारीरिक सक्षमतेबरोबरच आरोग्याबाबतीतही मार्गदर्शन केले जाणार आहे. परिपूर्ण प्रशिक्षण देण्याचे नियोजन असून, यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेवर जबाबदारी सोपवली आहे. उत्तम प्रकारे प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी संस्थांचा देखील हातभार घेतला जाणार असून, मुलींना स्वसंरक्षणाबरोबरच मार्शल आर्ट, योग, बौद्धीक कौशल्य, सैनिकी शिक्षण देण्याचा मानस आहे. हल्ली शालेय विद्यार्थिनींवर अन्याय होण्याचे प्रकार वाढत असून, यातून मुलीच स्वतःचे स्वसंरक्षण कशा करतील, यावर भर दिला जाणार आहे. सध्या शालेय मुली देखील सक्षम होण्यास तयार असून, त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले तर त्यान निर्भयपणे वावरतील, असा शालेय शिक्षण विभागाचा विश्र्वास आहे.

### लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा !

## सर्वोत्कृष्ट पहिल्या पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूरचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया) मार्फत करण्यात आले. या अंतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांची नावे राज्य शासनामार्फत प्रजासत्ताक दिनी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचाही समावेश असून यानिमित्ताने लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मनाचा तुरा रोवला गेला आहे. पालकमंत्री



शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या नेतृत्वात लातूर जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमांची यानिमित्ताने राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील प्रशासनिक कार्यालयांसाठी १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित व नागरिकाभिमुख करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने १ जून २०२५ पासून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली होती. प्रामुख्याने संकेतस्थळ सुधारणा, सेवा हमी कायदा (आरटीएस), ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, व्हाटसअप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर आदी बाबींचा समावेश होता.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इंडिया गेट प्रतिकृतीने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने साकारण्यात आलेल्या इंडिया गेटच्या सुंदर प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या अभिनव उपक्रमांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध पथ संचलन, मानवी मनोरे, इयत्ता दहावीचा विद्यार्थी अनुराग सावंत याची योगा प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांची साहित्य कवायत, सामूहिक कवायत, देशभक्तीपर गीते अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे सदस्य तथा ज्येष्ठ उद्योजक



दिलीप माने यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर, डॉ. रमेश जाजू, रामप्रसाद राठी, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात विद्यालयाच्या राष्ट्रीय स्तरावर गेलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलन आणि प्रात्यक्षिकांनी सर्वांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या वतीने टाकाऊ वस्तूंपासून देशभक्तीपर प्रेरणादायी प्रतिकृती तयार करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. यावर्षी सामाजिक शास्त्र विभागाच्या शिक्षकांनी अत्यंत सुंदर अशी इंडिया गेटची आकर्षक प्रतिकृती तयार केली होती. या प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतना सारडा यांनीही यावेळी या प्रतिकृतीचे निरीक्षण करून सामाजिक शास्त्र विभागाच्या संबंधित शिक्षकांचे कौतुक केले.

प्रमुख अतिथी दिलीप माने यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रजासत्ताक दिनाचे महत्व सोप्या शब्दात विशद केले. भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या अधिकारांचीही त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या शब्दात माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या पथसंचलनाने आपण प्रभावित झाल्याचे सांगून विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या माध्यमातून केले जात असल्याचे संगितले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अभ्यासाव्यतिरिक्त करणे घातक असल्याचेही त्यांनी यावेळी बोलून दाखविले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### घर नसलेल्यांना कबाले देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** शहरात खाजगी व शासकीय जागेत झोपड्या घालून राहिलेल्या लोकांना कबाले देऊन घरकूल योजना राबवावी, अशी मागणी तालुक्यातील सलगरा (बु.) येथील बालाजी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. लातूर शहरातील विलास नगर, यशवंत शाळेच्या बाजूस, समता नगर, बुद्ध गार्डनच्या भोवती श्रमिक लोकांची वस्ती आहे. शहरात गोरगरीब नागरिकांना घरे नाहीत, त्यांना किमान हक्काचे कबाले दिले तर त्यांच्या घरांचा प्रश्न मिटेल. महसूल प्रशासन व महानगरपालिकेने सर्व्हे करुन गोरगरीब, मजूर लोकांना हक्काचे कबाले द्यावेत. या गरजू लोकांना कबाले द्यावेत. बऱ्याच लोकांना इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकूल योजनेचा लाभ मिळत नाही. अशा लोकांना जिल्हाधिकाऱ्यांनी शहरात कबाले देण्याची सोय करावी, अशी मागणी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## वाहतुकीचे नियम युवकांनी अंमलात आणावेत : सोनटक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** वाहतुकीचे नियम सर्वांनी मिळून पाळणे आवश्यक असून, युवकांनी जोश व जल्लोषात वाहने चालू नये. रस्त्यावर घडणाऱ्या दुर्घटना टाळणे आवश्यक असून, बेफिकीर राहणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे, अति वेगाने वाहन पळवणे, हेल्मेट न वापरणे, लायसन नसतांना गाडी चालवणे, सिग्नल पाहून वाहन चालवणे, जास्तीचे प्रवासी सोबत घेऊन नियमबाह्य वर्तणूक करणे ही काळजी घेण्याबरोबर आपली गाडी व्यवस्थित ठेवणे. नेहमीच सर्व्हिसिंग करणे जागरूक असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन मं-डळ कार्यालयाचे अधिकारी शिवाजी सोनटक्के यांनी केले.

येथील श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६', सडक सुरक्षा व जीवन रक्षा या विषयावर शिवाजी सोनटक्के बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे हे होते. यावेळी अभिजीत टिळे, डॉ. यु. टी. गायकवाड, प्रा. अनिता गायकवाड व राज्यशास्त्र विभाग प्रमुख व या स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी रस्ता वाहतूक सुरक्षिततेसाठी आवश्यक तो शपथविधी समारंभघेण्यात आला. यावेळी अभिजीत टिळे यांनी युवकांना शपथ देऊन देवदूत ही संकल्पना सांगितली. देवदूत म्हणजे अपघाता प्रसंगी धावत जाऊन मदत करतो त्यांना देवदूत मानले जाते. अशा व्यक्तींचा सत्कारही परिवहन महामंडळ करते ही माहिती दिली. प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे यांनी केले.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दिगत करावी

### पूर्वतयारी आढावा बैठकीत ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येत असून या वर्षी महोत्सवाचे ७३ वे वर्ष आहे. गत ७२ वर्षापासून सुरु असलेल्या या महोत्सवाला गौरवशाली परंपरा असून ही परंपरा अधिकाधिक वृंध्दिगत करावी, असे आवाहन देवस्थान समितीचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या प्रसंगी विश्वस्त अशोक भोसले, रमेश बिसेन, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर परजिल्ह्यासह कर्नाटक राज्यात श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव पोहचला असल्याचे सांगून या यात्रा महोत्सवाला हजारो भाविकांसह नागरीकांचा मोठा सहभाग नोंदवला जात असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. ७२ वर्षापासून सदर यात्रा महोत्सव भरविण्यात येत असून यात्रा महोत्सवाला यशस्वी करण्यासाठी लातूरसह परिसरातील



अनेक शिवभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आपले योगदान देतात. त्याच बरोबर विश्वस्तही तितक्याच ताकदीने या सर्वांच्या पाठिशी उभे राहून यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताकद देत असतात. या महोत्सवाला सिध्देश्वर महाराजांच्या आशिर्वादाने व सर्वांच्या सहकार्याने गौरवशाली परंपरा लाभलेली असून ही परंपरा वृंध्दीगत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले.यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत होत असून या समितीतील प्रत्येक सदस्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

यात्रा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी या बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यामध्ये झेंडा मिरवणूक, यात्रा स्टॉल, पशु व कृषी प्रदर्शन, कुस्ती, भोजन, भजन व किर्तन, अभिषेक, संरक्षक, स्वयंसेवक, विद्यूत व पाणी पुरवठा, प्रसाद वाटप, पास दर्शन, रुद्राभिषेक व महिला स्पर्धा, रचना व सजावट आणि प्रसिध्दी समितीचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून यात्रा महोत्सव यशस्वी करून महोत्सवाची गौरवशाली परंपरा जोपासली जाईल, असा विश्वास या समितीचे प्रमुख व समिती सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्रात बिहार भवन नको, मुंबईत महाराष्ट्र भवन उभारावे

### व्ही. एस. पँथर संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** महाराष्ट्रात बिहार भवन बांधण्याऐवजी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात यावे, अशी मागणी व्ही. एस. पँथर संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार जिल्हा शाखेच्या वतीने, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातून उपचारासाठी तसेच विविध प्रशासकीय कामांसाठी मुंबई येथे येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. निवासव्यवस्थेअभावी सर्वसामान्य नागरिकांना खासगी लॉज व हॉटेलमध्ये महागड्या दराने थांबावे लागते. त्यामुळे मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारल्यास राज्यातील नागरिकांना सवलतीच्या दरात निवासाची सुविधा उपलब्ध होईल. महाराष्ट्र शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारावे, अन्यथा व्ही. एस. पँथर्स संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रितम दंडे, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे, विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सूरज कांबळे, महादेव कांबळे, शहर सचिव रोहित दंडे, शहर संघटक रितेश जांभळे, शहर सदस्य सुदर्शन ओव्हाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहे.